# *मग येशू आला आणि बोलावले*

संत योहान, 11वा अध्याय 18व्या वचनापासून सुरुवात करु, मी वाचू इच्छितो.

*बेथानी यरुशलेमेजवळ म्हणजे तेथून पाऊण कोसावर होती.*

*तेथे यहुद्यांपैकी पुष्कळ लोक मार्था व मरिया ह्यांचे त्यांच्या भावाबद्दल सांत्वन करण्यास आले होते.*

*येशू येत आहे हे ऐकताच मार्था त्याला जाऊन भेटली पण मरिया घरातच बसून राहीली.*

*मार्था येशूला म्हणाली, प्रभूजी, आपण येथे असता तर माझा भाऊ मेला नसता;*

*तरी आताही जे काही आपण देवाजवळ मागाल ते देव आपल्याला देईल, हे मला ठाऊक आहे.*

*येशूने तिला म्हटले, तुझा भाऊ पुन्हा उठेल.*

*मार्था त्याला म्हणाली, तो शेवटल्या दिवशी पुनरुत्थानसमयी पुन्हा उठेल हे मला ठाऊक आहे.*

*येशूने तिला म्हटले, पुनरुत्थान व जीवन मीच आहे, जो माझ्यावर विश्वास ठेवितो तो मेला असला तरी जगेल.*

*आणि जिवंत असलेला प्रत्येक जण जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो कधीही मरणार नाही, हे तू खरे मानतेस काय?*

*ती त्याला म्हणाली, होय, प्रभूजी, जगात येणारा जो देवाचा पुत्र ख्रिस्त तो आपणच आहां. असा मी विश्वास धरला आहे.* (आणि ते पाहा)

असे बोलून *ती निघून गेली व आपली बहिण मरिया हिला गप्तपणे बोलावून म्हणाली, गुरुजी आले आहेत व ते तुला बोलावित आहेत.*

2 आपण प्रार्थना करुया. स्वर्गिय पित्या आज रात्री ही वचने आमच्या हृदयात पक्की कर, जसे आम्ही आता तुझी वाट पाहत आहोत. तुझे वचन, तुझा सेवक, आणि विषय शीर्षक सर्व काही तुझ्याकडे समर्पित करतो येशू ख्रिस्ताच्या नावाने. आमेन.

तुम्ही बसू शकता.

3 माझा येथे असण्याचा उद्देश हा देवाच्या लोकांना मदत करण्याचा प्रयत्न करणे होय. अशा रितीने नाही की प्रार्थना करावी म्हणून आणि आजाऱ्यांवर हात ठेवावे, परंतु त्यांनी येशू ख्रिस्ताला जो देवाचा पुत्र आमच्यामध्ये ओळखून घ्यावे, आम्ही आज रात्री या विषयावर बोलत आहोत: *मग येशू आला आणि बोलावले.*

4 आता ज्या वेळेविषयी आम्ही बोलत आहोत, ती वेळ फार दुःखी होती. जर तुम्ही आपल्या प्रभूच्या जीवनातील गोष्टी जर कधी वाचल्या, तर आम्हाला कळेल की या मुलाचा, लाजरचा तो एक महान मित्र होता. तो होता...योसेफाच्या जाण्यानंतर किंवा, त्याने घर सोडले आणि मार्था, मरिया आणि लाजाराकडे राहण्यास आला. आणि त्यांची चांगली मैत्री होती. त्यांची...तो त्यांना पाळकाप्रमाणे होता, एक—एक खरा मित्र. आणि त्याच्यासाठी पांघरण्यास, एक झगा तयार केला होता, मला वाटते, त्यांचा दावा आहे

की, त्यांनी तो विणला होता. संपूर्णतः सांध्याशिवाय विणला होता. आणि मग त्यांनी त्याच्यासाठी काही वस्तू बनविल्या होत्या, कारण त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला होता. ते तेच होते त्यांनी—त्यांनी त्यावर विश्वास ठेवला होता आणि पाहीले होते. त्यांनी चर्च सोडले होते, आणि तशाचसारखे, त्याला अनुसरण्यासाठी. आणि तसे करणे ही गोष्ट त्या दिवसात मोठी होती, कारण त्याचा दंड मृत्युही असू शकत होता, त्या—त्यापासून दूर जाणे.

5 परंतु, येशूविषयी त्यांचा सर्वत्र दावा हाच होता की तो मंडळ्या तोडत आहे, आणि त्यांच्या धर्मगुरुविरुध्द वाईट बोलत आहे, आणि—आणि अशासारखे, त्याने—त्याने त्यांना फार मोठी जखम केली होती असे त्यांचे म्हणणे होते. आणि—आणि त्याला जर कोणी कबुल करील तर त्यांना सभाबहिष्कृत करावे असे होते. आणि मग जर तुम्ही त्या चर्चमधून बाहेर पडले तर, ते—ते विचार करीत होते की तुम्हाला उद्धाराची संधी—कधी मिळणार नाही. जर तुम्ही त्यांच्यातील एकातरी संप्रदायाशी संबंधीत नसाल, जसे परुशी, सदुकी किंवा असे काही, तर त्यांना त्याबाहेर जाणे म्हणजे उद्धार नसल्यासारखे होते. आणि त्यांच्याकडे चावी असल्याकारणाने त्यांना अधिकार होता, चाव्या होत्या, आणि की ते जर इच्छितील तर तुम्हाला लाथ देऊन बाहेर काढु शकत होते. असे त्यांचे स्वतःचे म्हणणे होते. यांत काहीही आश्चर्य नाही, येशूने म्हटले, "तुम्ही तुमच्या संप्रदायामुळे, देवाचे वचन रद्द केले आहे." समजले?

6 आणि आता त्याची पुनरावृत्ती होत आहे, कारण आम्ही सर्व असे जाणतो की इतिहासाची पुनरावृत्ती वारंवार होते. आणि ते पुन्हा झाले आहे. आणि ही—ही सांगण्यास वाईट वाटण्यासारखी आहे, परंतु त्याविषयी पुन्हा घडेल अशी भविष्यवाणी केली होती, आणि ती पुन्हा पूर्ण झाली आहे.

आम्हाला असे आढळते की येशूविषयी चांगला विचार केला गेला नाही.

7 पुष्कळ वेळा, लोक मनुष्याचा न्याय करु इच्छितात, जे त्यांच्याशी सहमत होत नाही. आम्ही तसे करु नये. आम्ही एक दुसऱ्याशी असहमत असू शकतो, तरीही मैत्रीपूर्ण राहावे. जर मी कोणा एका मनुष्याबरोबर सहमत नसेल, आणि तरीही मी त्याच्यावर प्रेम करतो आणि त्याच्यासाठी प्रार्थना करतो, आणि शास्त्रभागातील वचनांवर जर त्याच्याशी—त्याच्याशी सहमत नसेन, आणि अधिक ज्ञान प्रकाशासाठी, तर मग मी त्याला काही सांगू शकत नाही. मी नेहमी त्याच्याशी असहमत राहू इच्छितो, मैत्रीपूर्णरित्या, कारण मी त्याच्यावर प्रेम करतो, आणि नक्कीच त्याचा नाश व्हावा अशी माझी—माझी इच्छा नाहीए. आणि त्यानेही माझ्याबरोबर तीच गोष्ट करावी; आमचा नाश व्हावा अशी इच्छा नाही. आणि आम्ही आमचे विचार वचन काय म्हणते या पायावर आधारीत करावेत. वचन हेच नेहमी सत्य असो. आमचे संप्रदाय किंवा आमचे काही विचार नव्हे, तर तो काय म्हणतो; व्यक्तिगत अनुवाद नाही, परंतु वचन काय म्हणते तेच.

8 एके रात्री, मी काहीतरी केले आणि अपवित्र असेच भासले. मला वाटते ते एका सेवकांच्या नाश्ताच्यावेळी एके सकाळी झाले. मी येशूची परिक्षा घेतली. मी म्हणालो, "तेव्हा जसे त्यांनी केले होते, तसेच ते आज करीत आहेत" हे चांगले होईल की जर मी ते पुन्हा एक क्षण म्हणून दाखविन, जर आम्हाला वेळ असेल. आता मी म्हणालो, आज आम्हाला असे आढळते...

9 लुथरच्या सुधारणुकीच्या प्रक्रीयेत, तो, त्यावेळी, तो म्हणाला न्यायीजन विश्वासाने जगेल. "जो मनुष्य विश्वास करतो, त्याला ते मिळेल." परंतु आम्हाला असे आढळते की पुष्कळ जणांनी विश्वास केला, परंतु त्यांना ते मिळाले नाही.

10 जॉन वेस्ली यांच्या दिवसांमध्ये, जर त्यांना दुसरा आशिर्वाद मिळाला, तर ते त्याला पवित्रीकरण म्हणत, अखंड पवित्रीकरण, ते आनंदीत होत आणि ओरडत असत. “सर्वजण ओरडले, म्हणजे त्यांना मिळाले” परंतु त्यांना आढळत असे की त्यांना ते मिळाले नाही. त्यांच्यातील पुष्कळ जण ओरड करीत, आणि त्यांना मिळाले नाही.

11 पेन्टीकॉस्टच्या दिवसांमध्ये, त्यांनी म्हटले, “आता दानांची पुर्नस्थापना येत आहे, आत्म्याचा बाप्तिस्मा. जे अन्य भाषेत बोलतात, त्यांना मिळाला आहे.” आम्हाला असे आढळते की पुष्कळजण अन्य भाषेत बोलले, आणि त्यांना तो मिळाला नाही.

12 म्हणून ते म्हणाले, “ठीक आहे, आत्म्याचे फळ, तेच ते आहे.” ओह, नाही, आत्म्याचे फळ नाही. ख्रिश्चन सायन्यकडे ते आहे,...प्रेम हे आत्म्याचे फळ आहे. मग, आणि त्यांच्याकडे दुसऱ्यांपेक्षा खूप प्रेम आहे, आणि ते येशू ख्रिस्ताचे देवपण नाकारतात; त्याला एक संदेष्टा म्हणून पुकारतात, एक साधारण व्यक्ती. पाहा? तर ते तसे होत नाही.

13 मला ते प्रश्नामध्ये एका मिनिटासाठी पाहू द्या. येशूला त्या परिक्षेत घेऊ या. या व्यासपीठावरुन, मी असे विधान केल्याबद्दल देव मला माफ करो, परंतु मी त्याच्याविरुध्द होती, एका क्षणासाठी, फक्त तुम्हाला प्रकाशात आणण्यासाठी. समजले?

14 “आता या रात्री माझ्याकडे तुम्ही लोकं आहात; मी तुमच्याशी संभाषण करीत आहे. मी मागील त्या दिवसात आहे, जेव्हा नाझरेथकर येशू या पृथ्वीवर होता. मी तुमच्याकडे आलो, आणि हा जो व्यक्ती येशू नाझरेथकर याच्या विरुध्द तुमच्याबरोबर तर्क करतो. आता आम्ही सर्व जाणतो की देव प्रेम आहे, बायबल तसे म्हणते तो आहे. ठीक आहे, आणि प्रेम, आत्मा हा सहनशील आहे, सौम्यता, धीर, लीनता आणि अशाप्रकारे, आणि प्रेम. आता मी म्हणतो, मला काही विचारावयास वाटते. एक ख्रिस्ती म्हणून आम्ही जाऊन घेऊया जे—जे आम्ही जाणतो.

15 “या तुमच्या वयस्क याजकांकडे पाहा. त्याचा आजोबा, पंजोबा, खापर पंजोबा हा एक याजक होता. एक याजक होण्यासाठी, त्याला त्या लेवी लोकांच्या वंशात जन्मावे लागेल. आता, आम्हास असे आढळते, त्याला एका तरुण मनुष्यांसारखे जीवन नाही, जसे बाकीच्या तुम्हा लोकांना आहे. तो काय करतो? तो स्वतःचा त्याग करतो, तो तेथे वरती राहून वचनाचा देवाच्या वचनांचा अभ्यास करतो. तो रात्र आणि दिवस, रात्र आणि दिवस त्या माध्यमातून जातो, त्याला प्रत्येक अक्षर माहीत हवे प्रत्येक वचन जे त्या गुंडाळीत आहे. त्याला ते पाठांतरीत केलेले हवे. त्याला—त्याला कशाही विषयी माहीत असायलाच हवे.

16 “आणि मग, त्याशिवाय, जेव्हा तुमचे माता व पिता विवाहबद्ध झाले, जे पती व पत्नी म्हणून कोणाकडून जोडले गेले? तुमचा वयस्क देवभक्त याजक. कोण तुमच्या बापाकडे आले, जेव्हा ते गरजू होते आणि त्याच्या शेतावर कोणी त्यांना कर्ज स्वरुपात पैसे दिले, यासाठी की गहाण ठेवणाऱ्यांनी ते घ्यावे? त्यांच्या बाजूने कोण उभे राहीले? तुमचे ते दयाळू याजक. तुझ्या आईच्या बाजूला कोण उभे होते, त्या खोलीमध्ये जेव्ही ती तुला जन्म देत होती? तो दयाळू जुने याजक. तुम्ही आजारी व गरजू असताना कोण तुमच्याकडे आले? तुमचा दयाळू याजक. तुला कोणी आशीर्वाद दिला आणि देवाकडे सोपविले आणि आठव्या दिवशी सुंता केली. तुमचा तो दयाळू याजक. जेव्हा तुझे आई आणि वडील यांचा विवाह तुटणार होता, कोणी त्यांना परत एकत्र आणले, आणि त्यांना एकत्रित ठेवले? तुमच्या दयाळू याजकाने. जेव्हा शेजाऱ्यामध्ये समस्या होती, कोणी त्यांची काळजी घेतली? तुमच्या दयाळू याजकाने. खचितच.

17 “ता या प्रकारचा वयस्क याजकाला माहीत आहे की बायबल म्हणते देवाला अर्पण्यासाठी एका कोकऱ्याची गरज आहे. तुमच्यातील अनेक जण व्यापारी मनुष्य आहेत, म्हणून तुम्ही कोकरे आपल्याकडे वाढवीत नाहीत, तरी देवाला एक कोकरु हवे आहे. त्यांनी काही मंच उभारले होते यासाठी की मेंढरे विकू शकतील म्हणजे व्यापारी लोक जाऊन ते विकत घेतील, त्यांच्या जीवासाठी ते अर्पण करु शकतील, जी देवाला हवीत.

18 “या तरुण व्यक्तीने, येशूला काय बोलले? तो कोठून आला आहे? म्हणाला तो एका कुमारीपासून जन्मला आहे. कोण अशा निरर्थक गोष्टी ऐकणार? आम्हाला माहित आहे की तिच्याकडे तो होता तिचा आणि योसेफ जन्मण्याअगोदर किंवा तिचा आणि योसेफाचा विवाह होण्याआधी तो जन्मला होता. आता आम्हाला असे आढळते की त्याला—त्याला सुरुवातीपासूनच वाईट नाव दिले होते.

19 “त्याच्याकडे कोणत्या सभासदाचे ओळखपत्र होते? जर तो एक देवभक्त होता, तर तो कोणत्या समुहाचा सभासद होता? जेव्हा तुमच्या याजकाने ते वचन समजण्यास अभ्यासले, अभ्यासले, अभ्यासले, अभ्यासले. येथे तो जवळपास येतो, जे त्यांने बांधले होते ते पाडून टाकू शकतो. त्याला तुम्ही ‘देव’ म्हणाल काय? खचितच नाही.

20 “आता, एके दिवशी, जेव्हा तुमच्या याजकाने ती जागा तयार केली,...आणि जेथे तुम्ही अर्पण विकत घेऊ शकता, या तरुण व्यक्तीने काय केले असावे? दयाळूपणा? त्याने मारले, काही दोऱ्यांचा कोरडा केला, काही कपडे व चामड्यांचा असा, आणि लोकांकडे रागाने पाहिले; आणि चौरंग पालथे केले, आणि—आणि त्यांना बाहेर घालवून दिले. आणि तुम्ही त्याला आत्म्याची फळे संबोधिता, त्यांच्याकडे रागाने पाहिले? आणि, पाहा, यहोवाच्या भक्तिपासून त्याने मनुष्याला वंचित ठेवले! व्यापारी व्यक्तिंना त्याची भक्ति करायची होती; त्यांने मेंढरे वाढविली नव्हती, आणि तो तेथे ती विकत घेण्यास गेला. आणि त्याने तर ते पालथे केले, आणि त्यावर लाथ उगारली, आणि त्यांना बाहेर घालविले.”

21 कोणाकडे तेथे आत्म्याचे फळ होते? पाहा. तेथे तुम्ही आहात. पाहा. आत्म्याचे फळ नाहीये, अन्य भाषा बोलत नाही आणि ओरडत ही नाही.

22 तुम्ही म्हणता, “मग, ब्रदर ब्रॅन्हम, याचा पुरावा काय? ह्याचा काय पुरावा आहे?” वचनाचे त्याच्या वेळी समर्थन करणे.

23 त्यांच्याकडे बायबल होते. जसे यहोवाने म्हटले होते तसाच तो होता व घडले होते. त्याला काही अनुवादाची गरज नाहीए. त्याचा अनुवाद करण्यात आला आहे. तेथे तुमचे याजक होते, तेथे ते सर्व होते, आणि सर्व काही आपल्या परिपाठाप्रमाणे होते, परंतु तरीही ते वचनाला पाहण्यास अयशस्वी ठरले. आणि त्याने ते वचन त्या युगासाठी जीवंत केले. हाच त्या युगाचा पुरावा होता.

24 लुथरकडे आपल्या युगाचा पुरावा होता, वेस्लीला आपल्या युगाचा, पेन्टीकॉस्टला आपल्या युगाचा, परंतु आम्ही दुसऱ्या युगात आहोत. त्या गोष्टी चांगल्या होत्या. परंतु बाळाप्रमाणेच, बोटं आहेत, डोळे आणि नाक, परंतु काही वेळानंतर त्याला मनुष्य स्वरुपाचे व्यक्ती बनावे लागेल. त्याला परिपक्व—परिपक्व मुल बनावे लागले, मग तो जन्माला आला, त्याला प्राण, शरीर व आत्मा आहे तो सभोवार फिरु शकतो.

25 आता आम्हाला असे आढळते की, हे सर्व काही, येशूने हे थोडक्यात जाहीर केले होते. फक्त तेच ज्यांना त्याने जीवनासाठी नेमले होते, त्यांनीच पाहीले. मोठा समुदाय नव्हता; त्याचा समुदाय हा कयफाच्या समुदायासारखा कधीच असू शकत नाही. का बरे, कयफाने संपूर्ण देशाला एकत्रीत करण्यास बोलाविले असते, येशूने फक्त जे थोडे तेच

एकत्रित होण्यास बोलाविले. त्याला पुष्कळ ओळखत नव्हते. हजारों हजार वेळा, जेव्हा तो या पृथ्वीवर आला. तो पृथ्वीच्या मधून गेला, आणि त्यांना हे माहीत ही नाही की तो येथे होता.

26 तसेच पुन्हा होईल! तो त्यांच्याकडे येईल जे जीवनासाठी बोलावलेले आहेत. त्याला माहीत आहे कोण जीवनासाठी बोलावले आहे आणि तो नाही...हे त्याचे काम आहे की त्याची काळजी घ्यावी.

27 आता आमच्या लक्षात येईल की मग ते चर्चच्या बाहेर आले, आणि त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला. वचन जे काही त्याच्याविषयी सांगते, तसाच तो होता.

28 आणि एके दिवशी त्याने त्यांचे घर सोडून दिले. मला येथे तीन गोष्टींवर बोलायचे आहे: येशू निघून गेला; मृत्युजवळ आला; आणि सर्व आशा सरुन गेली. मी या तीन गोष्टींवर काही वेळ बोलू इच्छितो.

29 येशू निघून गेला. आणि जेव्हा तो निघून गेला, तेव्हा समस्या आली. आता, जेव्हा तो आम्हाला सोडतो, किंवा तुमचे घर जेथे तुम्ही राहता, तेव्हा त्या रस्त्यात अडचणी येतात. जेव्हा येशू निघून जातो तेव्हा सैतानाला उघडा दरवाजा मिळतो.

30 तो निघून गेला, आणि—आणि तो जाताच, मग मृत्यु आत आला. आणि जेव्हा येशू बाहेर जातो तेव्हा मृत्यु आत येतो. त्याच्यापासून वेगळे होणे म्हणजेच मृत्यु, म्हणून मृत्यु आत येतो जेव्हा येशू निघून जातो.

31 आणि मृत्यु लाजरासह रेंगाळत होता. आणि तेव्हा तो एक ज्यावर ते विश्वास ठेवीत होते आणि प्रेम करीत होते, त्यांनी त्यांच्याकडे पाठवले की येऊन लाजरसाठी प्रार्थना कर, कारण त्यांनी त्याला पाहिले होते आणि समजले होते की तो देवाला ओळखतो, की कोणीही देव...मार्थाने ते तेथे बोलून दाखवले की, "तरी आताही जे काही आपण बोलून देवाजवळ मागाल, ते देव आपल्याला देईल." तिने ओळखले होते की तो व देव एक होता. तो त्या समयाचे वचन होता, म्हणून तिने ते ओळखले. आणि तिला ठाऊक होते, जर ती त्याच्याबरोबर भेटू शकली असती, परंतु तो गेला होता आणि त्या त्याला भेटू शकल्या नाही. आणि त्याने त्याला बोलवण्यास पाठवले, आणि, तो येण्याऐवजी, तो पुढे गेला. आणि मग त्यांनी त्याच्याकडे पुन्हा पाठवले, आणि तो येण्याऐवजी, तो पुढे गेला.

32 कधीकधी, आपण आश्चर्य करितो का त्या गोष्टी घडल्या, परंतु वचन असे सांगत नाही का की, "देवावर प्रीती करणाऱ्यास सर्व गोष्टी मिळून कल्याणकारण होतात?" त्याला ठाऊक आहे तो काय करीत आहे. जर तो उशीर करतो, ते ठीक आहे. त्याला ठाऊक आहे, तो काय करीत आहे. तेथे एक उद्देश होता.

33 आपण पाहतो की तो संत योहान 5:19 मध्ये म्हणतो, "मी तुम्हाला, खचित, खचित सांगतो, पुत्र, पित्याला जे काही करिताना पाहतो, त्यावाचून काहीही त्याला स्वतःला होऊन करिता येत नाही."

34 पित्याने त्याला दूर जाण्यास सांगितले होते, आणि इतके दिवस दूर राहण्यास सांगितले होते.ते दिवस पूर्ण झाल्यानंतर, मग तो म्हणाला जे त्याने म्हटले होते, की, "आपला मित्र लाजर झोपला आहे."

आणि तो म्हणाला, "ठीक, तो चांगले करितो."

35 त्याने म्हटले, "तो मेला आहे. आणि मी तेथे नव्हतो म्हणून तुमच्यासाठी मला आनंद वाटतो." कारण, ते त्याला शोधून त्याच्याकडे नेण्याचा प्रयत्न करीत होते, की त्याला बरे करावे किंवा सांगावे की काय करावे. परंतु त्याला ठाऊक होते की काय करावे, म्हणून

त्याने अगदी तेच केले जे त्याला करण्यास सांगितले होते. दूर राहा. जर तुम्ही त्याला कबरेजवळ पाहिले जेव्हा तो परत आला. त्याने व्यक्त केले की जेव्हा तो परत आला आणि हे घर सापडले.

36 सर्व आशा संपल्या होत्या. लाजर मेला होता. प्रत्येक ताशी, ते विचार करीत होते, “तो कदाचित दृश्यात येईल. तो कदाचित दृश्यात येईल. तो कदाचित परत येईल.” शेवटी, तो मेला, त्याने श्वास सोडला.

37 ते बाहेर गेले, त्याला सुगंधित केले, त्याच्या शरीरातून रक्त घेऊन, त्याला तागाच्या वस्त्रात, मसाला भरुन गुंडाळले, आणि त्याला सुगंधित केले आणि त्याला कबरेत ठेवले, कबरेवर धोंड ठेवली, जी त्या दिवसात त्यांची गाडण्याची रीत होती. जमिनीत एक भोक, ते कदाचित एक खडकात, आणि एक धोंड त्याच्यावर ठेवली, ती त्यांची रीत होती.

38 पहिला दिवस गेला, दूसरा दिवस गेला, तिसरा दिवस गेला, चौथा दिवस गेला, तो मनुष्य कबरेत पूर्णपणे कूजला होता. त्याचे नाक कदाचित आत पडले असेल. मला वाटते ती पहिली गोष्ट असते जी पडते, ते नाक आहे. आणि तो पूर्णतः कुजला होता. त्याचे—त्याचे शरीर पुन्हा मातीत, भूमित मिळाले होते, किंवा पुन्हा तो परतणार होता. त्याचा आत्मा कोठेतरी त्याच्यापासून चार दिवसाच्या प्रवासात होता.

39 त्याला पुन्हा पाहण्याच्या, ह्या जीवनातील, सर्व आशा संपल्या होत्या. आणि तेव्हा जेव्हा सर्व आशा संपल्या होत्या...ते वाट पाहत होते, “कदाचित जर तो पहिल्या, दुसऱ्या दिवशी येईल!” नाही. तेव्हा तो मेला, आणि तो आला नाही. तेव्हा व्याकूळता आली.

40 थोड्या वेळाने तेथे कोणीतरी तिला म्हटले असेल, “प्रभूजी बाहेर आहे.” येथे मार्था रस्त्यावर जाते.

41 येशू त्या काळोख्या समयी आला जेव्हा प्रत्येक आशा संपली होती. तीच सहसा वेळ असते जेव्हा तो येतो. पाहा? तो अगदी काळोख्या समयात येतो, तेव्हा येशू दृश्यात येतो.

42 आता लक्ष द्या, तो येतो आणि मार्थेला बोलावतो. त्याची उपस्थिती नविन आशा आणते. काही बाब का असेना, जरी तो मुलगा मेला होता, तरीही त्याची उपस्थिती नविन आशा आणते.

43 ह्या रात्री तुम्ही कदाचित येथे बसलेले असाल, माझ्या मित्रांनो, जेथे डॉक्टरांनी तुमची आशा कर्करोगाची, हृदय विकाराची सोडली असेल; कदाचित ह्या खुर्चीमध्ये, पांगळे झाले आहात, सर्व विज्ञानाने सांगितले की तेथे तुमच्यासाठी काही आशा नाही; कॅल्शिअमची गाठ तुमच्या—तुमच्या—तुमच्या हाडात झाली असेल, की तुम्ही त्यांना अधिक वाकवू शकत नाही. किंवा, तुमचे—तुमचे हृदय इतक्या वाईट अवस्थेत आहे, की डॉक्टर म्हणतात की कदाचित तुम्ही कोणत्याही मिनीटात जाल. ओह, आणि कित्येक लोकांचे समुह कर्करोग आणि क्षयरोगाने पीडीत, कदाचित तुमच्याकडे शेवटची आशा असेल, आणि असे भासते जणू काही डॉक्टरने तुम्हाला निराश केले आहे, तरीही, येशू ख्रिस्ताची उपस्थिती आणि उपस्थितीची ओळख, पुन्हा आशा आणते.

44 कोणीतरी तुम्हाला त्याचे नाव सांगेल. कदाचित तुम्ही त्याच्याविषयी कधीच ऐकले असेल, परंतु कोणीतरी सांगते, “मला एक मंडळी ठाऊक आहे, ते देवावर विश्वास ठेवतात आणि ते आजाऱ्यासाठी प्रार्थना करतात,” आता घाई करा. (तुम्ही मरणासाठी तयार आहात) पहा, नविन आशा उत्पन्न झाली. ते असेच करते. त्या काळोख्या समयात, ते सहसा जेव्हा कोणीतरी त्याविषयी सांगते, तुम्हाला येशूविषयी सांगते. त्याची उपस्थिती नविन आशा आणते.

45 आज रात्रीही तशीच गोष्ट होवो, जशी ती मागील रात्री झाली, जेव्हा आपण ते प्रकट झालेले वचन कुठल्याही संशयाच्या छाये पलिकडे जाऊन पाहिले, ते प्रकट केले आणि सिध्द केले; की *तो* येशू जो एकोणीसशे वर्षांअगोदर जीवंत होता, जो कलवरीवर मेला, तिसऱ्या दिवशी उठला, आणि शिष्यांना प्रकट झाला आणि त्यांचे डोळे उघडले, आणि ह्या दिवसासाठी अभिवचन दिले, तो येथे ह्या रात्री आपल्यामध्ये आता उपस्थित आहे. तो लोकांना आशा आणतो. नविन आशा अचानक चमकतात.

46 कदाचित कोणी म्हणेल, "ही मंडळी काही वेळासाठी शुष्क प्रकारची झाली आहे. आपल्याला काही महिन्याकरीता—कराता—करीता चांगले ताजे पाणी मिळाले नसेल. आपल्याला संजीवन मिळाले नसेल. प्रत्येकजण इतका मंद दिसत आहे, किंवा काहीतरी दुसरे. आपण फक्त चर्चला जातो आणि स्तोत्र गातो, आणि—आणि काही संदेश ऐकतो आणि परत जातो." परंतु अचानक, तेव्हा, जेव्हा आपण कोरडे व्हायला सुरुवात होते, तेव्हा येशू दृश्यात येतो, आपल्याला ताजेतवाने करते, आपल्यासाठी नविन काहीतरी आणतो. तो ते करण्यासाठी सदैव तेथे आहे. नविन आशा येते जेव्हा—जेव्हा येशू आत येतो. त्याची उपस्थिती नविन आशा आणते.

47 तिला माहित होते की तो देवाचे प्रकट झालेले वचन आहे. तीने ते युग पाहिले होते. किंवा जर ती तशी नसती, तर ती अजूनही सनातनी असती. ती चर्चला जडून राहिली असती. परंतू तिने ते अभिवचन दिलेले वचन पाहिले होते. तिने ते अभिवचन दिलेले वचन त्याच्याद्वारे प्रकट होताना पाहिले होते आणि तिला माहीत होते की तो जीवंत वचन होता. आणि जेव्हा तिने त्याच्याविषयी ऐकले, तिने ह्याकडे लक्ष दिले नाही की किती जण तिच्यावर टिका करतील, आणखी काय, ती त्याच्यासाठी होईल तितक्या त्वरीत बाहेर आली. समजले? तिला ठाऊक होते की तो प्रकट झालेले वचन होता.

48 निःसंशय परंतु तिने त्याच्या दिवसातील एलियाची गोष्ट वाचली होती. आता, तो त्या दिवसांतील परमेश्वराचे प्रकट झालेले वचन होता. तो एक संदेष्टा होता, आणि देवाचे वचन संदेष्ट्याकडे येते. आणि तेथे एक स्त्री होती, तिला एक लहान मूल होते जे तिला त्या संदेष्ट्याच्या आशीर्वादाने देण्यात आले होते की त्या संदेष्ट्याने तिला आशीर्वादीत केले होते, आणि तिला ते मूल झाले होते.

49 एके दिवशी, सुमारे अकरा वाजता, त्याला उष्माघात झाला असेल. तो त्याच्या वडिलांबरोबर बाहेर शेतात होता. बायबल सांगत नाही की तो होता, ते सांगते की तो उष्माघात होता, परंतु तो रडू लागला, "माझे डोके! माझे डोके!" सुमारे दिवसा अकरा वाजता. आणि त्याच्याकडे एक चाकर होता, वडिलाने त्याला घराकडे आणले. तो दुपारपर्यंत त्याच्या आईच्या मांडीवर होता, अधिक आजारी झाला, आणि शेवटी मेला.

50 आणि आता निराशेत जाण्याऐवजी,...सर्व शेजारी आत आले ओरडू लगले आणि असे चालले होते, परंतू ती दृढ आई, तिचे मूल मेले होते, तिने ते वर त्या लहान खोलीत नेले जी तिने त्या संदेष्ट्यासाठी दिली होती आणि त्याला त्याच्या बिछान्यावर *अशाप्रकारे* ठेवले. आणि ती नोकराला म्हणाली, "गाढवावर खोगीर घालून ती वसली आणि तू हे एकसारखे हाकीत ने. मी सांगितल्यावाचून ते हाकण्याचे सोडू नको" ओ माझ्या देवा! ते तसेच आहे!

51 आमच्याकडे वादविवाद व अनावश्यक बडबडीसाठी वेळ नाहीए. हे त्या दिवशी होऊन चुकले. आपण पुढे जाऊ या. आम्हाला तेथे गेले पाहीजे. आमची गरज आहे.

52 आणि म्हणून त्याने म्हटले, "तुम्ही पुढे जात जा, आणि तुला आज्ञा मिळत नाही तोवर तू स्वार होणे थांबवू नको." आणि ते निघून गेले जोपर्यंत त्यांना एलिया भेटत नाही.

53 एलिया, हा तर देवाचा एक मनुष्य होता, ख्रिस्तासारखा नव्हता; ख्रिस्ताला सर्व काही ठाऊक होते कारण तो देव होता. एलिया तर त्या देवामधील एक भाग होता. म्हणजे एलियामध्ये ख्रिस्त होता. आणि तोच त्या वेळेचा संदेश होता, कारण प्रभूचे वचन त्या काळासाठी संदेष्ट्याबरोबर होते.

54 येशू हा सर्व संदेष्ट्याची पूर्णता होता, प्रत्येक जणांनी फक्त त्यालाच प्रकट केले होते. हेच सर्व होते. योसेफापासून तर पुढे म्हणजे चांदीच्या तीस शिक्क्यांपासून, सर्वत्र, तो—तो ख्रिस्ताला दर्शवित होता. तसाच मोशेही!

55 दाविद, एक नाकारला गेलेला राजा त्या टेकडीवर बसलेला होता, रडत होता कारण त्याला नाकारले गेले होते. आठशे वर्षानंतर, दाविदाचा पूत्र टेकडीवर होता. तेथे त्या दाविदामध्ये ख्रिस्ताचा आत्मा होता. आणि तो…बापरे! तो दाविदाचा अंकूर आणि मूळ दोन्ही होता. आणि म्हणून तो टेकडीवर बसला होता, रडत होता, एक नाकारलेला राजा म्हणून, "यरुशलेमे, यरुशलेमे, कितीदा तरी माझी इच्छा होती की तुला पंखाखाली घ्यावे, जशी कोंबडी आपल्या पिल्लांना एकवट करीते." ते काय होते? तो मागे तेथे ख्रिस्त होता.

56 तो ख्रिस्त रडत होता जेव्हा दाविदाने स्तोत्र लहिले, "माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास? माझ्याकडे ते टक लावतात व माझी सर्व हाडे मोजतात. त्यांनी माझे हात व पाय विंधिले आहेत. ते माझी वस्त्रे त्यांच्यात वाटतात. ते माझ्या झग्यावर चिठ्ठ्या टाकतात." तो ख्रिस्त बोलत होता दाविदामधून. हे खरे आहे. तो वचनाचे प्रकटीकरण होता. ख्रिस्त त्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी आला ज्या संदेष्ट्यांच्याद्वारे बोलण्यात आल्या होत्या कारण वचन हे संदेष्ट्यांबरोबर होते.

57 गेल्या रात्री तो आपल्या धड्यात बोलला होता, की संदेष्ट्यांनी त्याच्या सांगितलेल्या गोष्टी तो पूर्ण करण्यासाठी आला कारण त्यांच्याकडे ते वचन होते. आणि एलिया हा देवाचा संदेष्टा होता, त्या दिवसाचा शब्द.

58 म्हणून ती शूनेमकरीण स्त्री संदेष्ट्याला धरुन राहिली जितपर्यंत तो येत नाही व देवाचे सामर्थ्य प्रकट होत नाही, आणि त्याने स्वतः त्या मुलाच्या शरीरावर पाखर घातली, आणि ते मूल परत जीवंत झाले.

59 आता मार्थेने हे ओळखले असेलच, जरी ती घरकामात फार गुंतलेली होती, भांडीधुणे आणि वैगेरे. परंतु तेथे तीने आपला रंग दाखविला. तिने हे दाखवून दिले की तिच्यामध्ये काय आहे. ती त्वरा करुन त्याला घेण्यासाठी गेली. जर देव एलियामध्ये होता, तर तो ख्रिस्तामध्येही असावा, कारण त्याने हे सिध्द केले की तो तोच व्यक्ती होता. आमेन. मला ते आवडते, तो निर्धार! ती त्याच्याकडे गेली. तिला त्याला भेटावयास हवे. आणि जसे तीला तो आढळला, तशी ती त्याला—त्याला भेटली; आता लक्षात ठेवा, तिला हे माहीत होते की तो कधीच बदलला नाही, की देव आपले कार्याची रुपरेषा बदलत नाही. जर तो त्या एलियामध्ये होता आणि मृतांना जीवंत करु शकत होता, तो ख्रिस्तातही होता आणि मृतांना जीवंत करु शकत होता, जरी त्याने तसे केले नाही, कारण तो तोच देव होता.

60 तो कधीच अजून बदललेला नाही! तो तोच देव आज रात्री आहे जसा तो अगोदर होता. तो काल, आज, व युगनुयुग सारखाच आहे. तो बदलत नाही.

61 आणि त्याला ठाऊक होते की तो त्याच्यामध्ये आहे. पाहा, थोड्या वेळेतच हे आता सिध्द होईल, जेव्हा तीने काहीतरी आपल्या भावाविषयी म्हटले, आणि ती म्हणाली, "प्रभू, तू आहेस मी—मी विश्वास करते."

62 आणि तो म्हणाला, “मी पुनरुत्थान आणि जीवन आहे. जरी तो मेला असेल तरी तो जगेल. आणि जो जीवंत आहे आणि मोझ्यावर विश्वास करतो तो कधीही मरणार नाही. मी आहे.” तोच तो मी आहे जो जळत्या झुडूपात होतो, मोशेबरोबर. “मी पुनरुत्थान आहे, मी जीवन आहे. मीच भिंत आहे. मी अजूनही तोच आहे. मी पुनरुत्थान व जीवन आहे. जो माझ्यावर विश्वास ठेवतो, तो जरी मेला असेल तरी तो जगेल. जो जीवंत आहे आणि माझ्यावर विश्वास ठेवतो, तो कधीच मरणार नाही.” या महान खात्रीनंतर जी तिला देण्यात आली, की तो आश्वासनाचे अभिवचन होता; जेव्हा त्याने संगितले, एक संदेष्टा म्हणून, तो खोटे बोलू शकत नाही. म्हणून तो, जेव्हा म्हणतो, “मी आहे तो. मी तो आहे. तो पुनरुत्थान आणि जीवन आहे.”

63 ती म्हणाली, “मी असा विश्वास धरला आहे की जो जगात येणारा, देवाचा पुत्र तो तूच आहेस. जरी माझा भाऊ मेलेला आहे, त्या कबरेत पडून आहे त्याचे...त्याचे शरीर आता कुजत आहे; परंतु आताही, जे काही तू बोलशील, ते घडून येईल.” हे खरे आहे!

64 त्याने ते म्हणताना ती ऐकू इच्छित होती! आमेन. ओह, मार्था, आज आम्ही कुठे आहोत? “फक्त शब्द बोल; माझा दास जगेल!” त्याला म्हणताना ऐकू इच्छित होती! ते ऐकून कदाचित म्हणाले असतील, की त्याने हे सांगितले आहे, परंतु येथे तो स्वतः होता. हे देवा, आंधळे डोळे तू उघड, यासाठी की त्यांना दिसावे! जेव्हा तो त्याच्या उपस्थितीत, वचन बोलतो, तेव्हा ते कायम प्रगट होतेच.

65 ती म्हणाली, “जे काही तू देवाजवळ मागशील, देव ते तुला देईल. मला फक्त ऐकू दे!” तिची इच्छा होती की त्याने शब्द बोलावा. हेच सर्व तिला ऐकायचे होते. फक्त वचन घ्या, तेच काय ते तिला हवेय, त्याचे ऐकू इच्छित होती की तो हे करील.

66 आणि मग त्याने ते सर्व योग्य केलं असतं, परंतु, तुम्ही पाहिलं, तर जो दृष्टांत पित्याने त्याला दाखवला होता, त्याला त्या कबरेजवळ उभे राहावे लागेल. बापरे! विश्वासाला पकडून ठेवा! देव सर्व गोष्टीत योग्य कार्य करतो. सर्व काही ठीक होईल. थोडे थांबा तिला त्या कबरेजवळ येऊ द्या.

67 लक्ष द्या, ती त्याला ते सांगण्याकरिता भेटण्यास गेली, जरी तो अजून ही...सर्व आशा समाप्त झाल्या, सर्वकाही. तो मेला होता, कबरेत कुजत होता, परंतु त्याने फक्त बोलावे, हेच तिला हवे होते.

68 आता जेव्हा तो म्हणाला, “मी पुनरुत्थान आणि जीवन आहे.” तिने विश्वास केला. तिने विश्वास ठेवला. आता लक्ष द्या, आता तिला अशक्य गोष्टींविषयी विश्वास करावा लागला, जेव्हा तिने त्याला बोलताना ऐकले. “मी पुनरुत्थान व जीवन आहे. जरी तो मेला असला, तरी तो जगेल, जो जगतो आणि जो माझ्यावर विश्वास करतो. मरणारच नाही.” म्हणाला, “तू यावर विश्वास ठेवतेस का?”

69 आणि ती म्हणाली, “हो प्रभू, मी त्यावर विश्वास ठेवते. मी विश्वास करते की तू देवाचा पुत्र आहेस जो जगात येणार होता.” मला ते आवडते. मला ते आवडते.

70 मी—मी हे अगोदर सांगितले आहे. ते आता कदाचित पुन्हा सांगेन. फार काळ झाला नाही, मी एका स्त्रीशी बोलत होतो ते एक चर्च होते. ज्याचा उल्लेख मी काही वेळा अगोदर केला. जे तो देव आहे, त्याचे देवपण ह्यावर विश्वास ठेवीत नाही; तो फक्त एक संदेष्टा होता, एक सामान्य मनुष्य.

71 खरेच, तो ते होता. तो ते ही होता, अधिक देव होता. समजले, तो प्रकटीकरण होता. येशू हे शरीर आहे, एक मुलगा, एक मनुष्य; देव म्हणजे जो त्याच्यात वास करीत होता.

देव त्याच्यामध्ये होता. तो देव मनुष्य होता. तो एक मनुष्य होता, तरीही तो देहात प्रकट झालेला देव होता. जेव्हा आपण येशूला पहातो, आपण देवाला पहातो. तेच तो म्हणाला, “जेव्हा तुम्ही पित्याला पाहता, मला पाहता, तुम्ही पित्याला पाहता.”, कारण तो प्रतिबिंब होता, कारण तो वचन होता, आमेन, ते प्रारंभी होते. आमेन.

72 त्याने संदेष्ट्यांना “देव” म्हटले. तुम्हाला ते माहीत आहे का? तो म्हणाला, “तुम्ही त्यांना ‘देव’ म्हटले ज्यांच्याकडे देवाचे वचन येते. तुम्ही मला दोष कसे देऊ शकता जेव्हा मी म्हणतो, मी देवाचा पुत्र आहे?”

73 कारण, तोच शब्द म्हणाला तो तेथे असेल, आणि तेथे पुन्हा वचन प्रकट झाले आणि तरीही त्यावर ते विश्वास ठेवणार नाही.

74 ही स्त्री मला म्हणाली, “मी तुला सिध्द करु शकते” म्हणाली, “मला तू प्रचार करताना ऐकायला आवडते, परंतु तेथे एक गोष्ट आहे जी तू अती करतोस.”

“अच्छा ती काय आहे?”

म्हणाली, “तू येशूवर फार फुशारकी मारतोस.”

75 मी म्हणालो, “मी आशा करतो की हेच सर्व आहे जे त्याच्याकडे माझ्याविरुध्द असेल जेव्हा तो येईल” आणि ती म्हणाली...मी म्हणालो, “मला वाटते तेच सर्व दोष तो माझ्यामध्ये शोधू शकतो” मी म्हणालो, “जर माझ्याकडे दहा हजार जीभा असत्या, तरी मी, तो काय आहे, हे पुरेसे बोलू शकत नाही, ओह बापरे!”

ती म्हणाली, “परंतु, तू, तू त्याला देव केले आहेस.”

76 म्हणालो, “तो होता. किंवा, जर तो नव्हता, तो जगातील सर्वात मोठा फसविणारा होता.”

ती म्हणाली, “तो संदेष्टा होता.”

77 मी म्हणालो, “तो एक संदेष्टा होता, हे खरे आहे: देव संदेष्टा, वचनाची पूर्णता. संदेष्ट्याकडे फक्त वचन येते, तेच त्याला बनवते संदेष्टा बनवते. परंतु तो वचनाची पूर्णता होता.”

78 आणि ती म्हणाली “मी तुला हे सिध्द करु शकते.” म्हणाली, “तू त्याला दैवी बनवतोस.”

मी म्हणालो, “तो दैवी होता.”

आणि ती म्हणाली, “तो दैवी असू शकत नाही.”

मी म्हणालो, “...परंतु तो होता.”

ती म्हणाली, “तू म्हणतोस तू बायबलवर विश्वास ठेवतो.”

मी म्हणालो, “मी ठेवतो.”

79 ती म्हणाली, “मी तुला तुझ्या स्वतःच्या बायबलवरुन सिध्द करुन दाखवीन, की तो दैवी नव्हता.”

80 मी म्हणालो, “तसे कर. जर बायबल तसे सांगते, तर मी त्यावर विश्वास ठेवीन, कारण मी विश्वास करतो वचन खरे आहे.”

81 ती म्हणाली, “लाजराच्या कबरेच्या रस्त्यावर, तुला संत जॉन 11मध्ये लक्षात आहे का?”

मी म्हणालो, “मला निश्चितच लक्षात आहे, बाई.”

82 म्हणाली, “आता, त्या रस्त्यावर, तो रडला. बायबल सांगते. ‘तो रडला.’”

मी म्हणालो, “निश्चितच, बायबल सांगते तो रडला.”

म्हणाली, “तो दैवी कसा असू शकतो आणि रडू शकतो?”

मी म्हणालो, “तो मनुष्य होता.”

“मनुष्य आणि दैवी?”

83 मी म्हणालो, “होय बाई. तू ते समजत नाही. तो तेथे जात असता एक—एक मनुष्य होता, जे रडत होते त्यांच्या बरोबर तो रडला, ते बरोबर आहे. जे शोक करीत होते त्यांच्यासह शोक करीत होता. तो मनुष्य होता. परंतु जेव्हा त्याने त्याचे लहान अशक्त, शरीर, सरळ केले, आणि म्हणाला, ‘लाजरा, बाहेर ये,’ आणि तो मनुष्य जो चार दिवस मृत होता, त्याच्या पायावर उभा राहिला. तेव्हा तो मनुष्यापेक्षा अधिक होता, तो देव मनुष्यात होता.” मेलेल्याला कोण उठवू शकते, परंतु देव? तो पुनरुत्थान व जीवन आहे! ते बरोबर आहे.

84 त्या रात्री समुद्रावर, जेव्हा तो तेथे बाहेर होता, थकलेला, नावेच्या मागे पडला होता, जेथे दहा हजार भूतांनी शपथ वाहिली ते त्याला त्या रात्री बुडवणार, आणि ती लहान जुनी नाव बाटलीच्या बूचासारखी वादळी समुद्रावर आपटत होती. भूतांनी विचार केला, “आता आपल्याला तो मिळाला आहे तो गाढ झोपला आहे, आपण ह्या संपूर्ण समुहाला बुडवूया.” ओह, तो मनुष्य होता, थकलेला, परंतु जेव्हा तो उठला, त्याने त्याचा पाय खेचावयाच्या दोरावर ठेवून उभा राहिला आणि वर पाहून म्हणाला, “शांत, स्थिर हो.” आणि वारा आणि लाटा त्याची आज्ञा पाळतात, तो मनुष्यापेक्षा अधिक होता.

85 जेव्हा त्याला भूक लागली होती, तो मनुष्य होता, डोंगरावरुन खाली आला, खाण्यासाठी एक भाकरीचा तुकडा किंवा काहीतरी शोधत होता, किंवा झाडाचे अंजीर शोधत होता. परंतु जेव्हा त्याने पाय भाकऱ्या आणि दोन मासे घेतले, आणि पाच हजारांना भोजन दिले, तो देव त्या मनुष्यात होता. ते बरोबर आहे.

86 ओह, प्रत्येक मनुष्य ज्याने कधी सोयाबीनच्या पर्वतासारखी रक्कम मोजली आहे, तो ह्यावर विश्वास करतो. सर्व कवी त्यावर विश्वास ठेवतात. आश्चर्य नाही एकाने लिहीले:

> जीवंत असता त्याने मजवर प्रेम केले; आणि मरण्याद्वारे, त्याने
> मला तारले;
> गाडण्याने, त्याने माझी पापे दूर वाहून नेली.
> उठण्याने, त्याने मला सर्वकाळासाठी न्यायी ठरविले.
> कोणाएके दिवशी तो येत आहे, ओह, महिमायुक्त दिवस!

87 एड्डी पेरोनेट, जो त्याची गाणी विकणार नाही. एके दिवशी, पवित्र आत्म्याच्या प्रभावाखील भरलेला असता, पेन पकडला, त्याने आपल्या सर्व गीतांतील पहिले गीत लिहीले, जेव्हा त्याने लिहीले.

> येशूच्या नावाच्या सामर्थ्याचा जयजयकार होवो!
> देवदूत दंडवत प्रणाम करो;
> राजाचा मुकूट पुढे आणा,
> सर्वांच्या प्रभूला मुकूट घाला! (हालेलुयाह!)

88 निश्चितच, तोच आपण विश्वास करतो की तो होता. होय, महाशय.

89 तिला आता ह्या अशक्य गोष्टींवर, ह्या आधुनिक विचारांच्या दिवसात विश्वास ठेवावा लागेल. म्हणून तुला ह्या अशक्य गोष्टींवर, नविन जीवन पहाण्यासाठी, काहीतरी घडताना पाहण्यासाठी, विश्वास ठेवावा लागेल. परंतु जर त्याने ओळखले,...तिने त्याला वचन म्हणून ओळखले, तर अशक्य गोष्टी घडू शकतात, कारण तो निर्माणकर्ता आहे, आणि त्याने सांगितलेल्या सर्व गोष्टींसाठी तो उभा राहील.

90 "आणि विश्वासणाऱ्यासाठी सर्व गोष्टी शक्य आहेत." ते त्याचे वचन आहे. परंतु अशक्य गोष्टी प्रकट केल्या गेल्या, जेव्हा देवाने त्याचे वचन घेतले. होय, महाशय जेव्हा देव त्याचे वचन घेतो, अशक्य गोष्टी प्रकट केल्या जातात जे देव सांगतो ते होणार, तेव्हा तुम्ही ते वचन घ्या आणि पाहा काय अशक्य गोष्टी घडतात. ते निश्चित होणार.

91 परंतु लक्ष द्या, तरीही त्या सर्वात, ती म्हणाली, "आता देखील, प्रभू, तू जे देवाकडे मागशील, ते देव करील." तिला माहीत आहे की ती फक्त ते वचन घेऊ शकते जे त्याच्याकडून येते. तेच सर्व तिने करण्याची गरज होती, ते वचन घ्यावे. होय, तो तिचा सर्वात अंधाराचा समय होता, आणि येशू तेथे येतो आणि बोलावतो. ओह, काय गोष्ट त्यांनी पाहिली, एक पुनरुत्थान!

आपण आणखी पाहूया जेथे अंधाराचा समय आला.

92 एके काळी तेथे एक मनुष्य होता, ज्याचे नाव ईयोब होते, बायबलमधील सर्वात जुना संदेष्टा. तो एक महान मनुष्य होता. त्याचे—त्याचे प्रभूवर प्रेम होते, आणि त्याने ते सर्व केले जे त्याला कसे करावे हे माहीत होते. आणि सैतानाने त्याला चाळावे अशी इच्छा केली, म्हणून तो एके दिवशी देवाला म्हणाला...होय, अधिक खरे म्हणजे देवाने त्याला म्हटले, "सैताना, तू कोठून आलास?"

93 तो म्हणाला, "ओह, पृथ्वीवर इकडे—तिकडे हिंडून आलो आहे."

94 त्याने विचारले, "माझा सेवक ईयोब यांच्याकडे तुझे लक्ष गेले होते काय? भूतलावर त्याच्या तोडीचा दुसरा कोणी नाही. तो परिपूर्ण मनुष्य आहे"

95 "ओह" तो म्हणाला, "निश्चितच, तू त्याला सर्व गोष्टी दिल्या आहेत, त्याच्यासाठी सर्वगोष्टी केल्या आहे. निश्चितच, तो एक महान मनुष्य आहे. परंतु त्याला एकदा माझ्या हाती दे, मी त्याची चाल बदलीन. मी त्याला तुला तुझ्या तोंडावर शाप देण्यास लावीन."

96 तो म्हणाला, "तू ते करु शकत नाही." हा त्याचा विश्वासणाऱ्यावर असलेला भरवसा आहे. का? तो असिमीत आहे. तो सार्वकालिक आहे. त्याला सुरुवातीपासून शेवट माहीत आहे; त्याला माहीत आहे, सैतान ते करु शकत नाही. कारण तो वचन आहे, त्याला माहीत आहे की ईयोब काय करील.

97 आता, लक्ष द्या, ईयोब, त्याने त्याला गळवांनी पीडीले, त्याच्या मूलांना मारले, त्याचे जे सर्व होते ते घेतले. त्याचे आरोग्य नष्ट झाले. अगदी त्याचे सांत्वन करणारे आले, आणि ते काहीच करु शकले नाही. परंतु फक्त त्याला तो गुप्त पापी असल्याचा दोष लावला. आणि वृध्द ईयोब अशा स्थितीत पोहचला की त्याला खूप त्रास झाला.

98 तुम्हाला प्रथम, त्रास झाला पाहिजे. तुम्ही अशा समयात आले पाहीजे जेथे तुम्ही आयुष्याच्या शेवटी आला.

99 ईयोब रस्त्याच्या शेवटी पोहोचला, जेव्हा तो म्हणाला, "माझा जन्म झाला तो दिवस शापित असो. प्रकाश न पडो, आणि रात्री चंद्र न प्रकाशो, माझे नाव कधीच न निघो" आणि त्या त्रासात, तेव्हा येशू बरोबर आला. त्याने खाली पाहीले, आणि तो म्हणाला, "मी एक मनुष्य पाहीला. फूल मरते, आणि वसंत ऋतुत पुन्हा उठते. जर एखादे झाड

खाली पडले, ते पुन्हा पाण्याच्या छिडकाव्याने वर येते.” त्याने पाहीले सर्व वनस्पतीत पुन्हा जीवन येते, परंतु म्हणाला, “मनुष्य खाली पडला, तो आत्मा सोडतो, तो कोठे आहे?” त्याला माहीत होते तो एक वृध्द मनुष्य होता. तो म्हणाला, “त्याचे पुत्र त्याविषयी शोक करण्यास आले, आणि त्यांना ते समझले नाही. ओह, तू मला कबरेत लपवशील आणि गुप्त जागी मला ठेवशील, तुझा क्रोध टळून जाईपर्यंत. माझ्यासाठी एक समय नियुक्त कर आणि एक समय माझ्यासाठी ठेव. आम्ही गेला...” आणि असेच, बोलत होता. तो त्याच्या त्रासाच्या टोकास होता, “काय होईल? पाने जगतात, झाडास पुन्हा येतात, परंतु मनुष्य खाली पडतो आणि आत्मा सोडतो!” तो दुःखात होता. त्याला माहीत नव्हते की त्याचे काय होणार, आणि त्याचे ह्या वयात काय होणार.

100 जेव्हा तो शोक करतो, तेव्हा येशू बरोबर येतो. देव त्याचे डोके आकाशाकडे करतो, आणि तो येशूला अंतिम दिवसात येताना पाहतो.

101 तो सर्वात अंधाराचा समय जेव्हा त्याची पत्नी म्हणते, “देवाला शाप द्या आणि मारुन जा,” तरी तो म्हणतो, “स्त्रीये, तू मूर्ख स्त्रीसारखी बोलतेस. परमेश्वराने दिले, आणि परमेश्वराने नेले, धन्य परमेश्वराचे नाव.” त्याच्या पत्नीनेही त्याला खाली केले. त्याच्या मंडळीनेही त्याला खाली केले. सर्वजणांनी त्याला खाली केले.

102 त्या अंधकाराच्या समयात, जेव्हा त्याला माहीत नव्हते तो तेथून कोठे जात आहे, येशू बरोबर आला. तेव्हा तो किंचाळला, “मला तर ठाऊक आहे की माझा उध्दारक जीवंत आहे, आणि तो अंती पृथ्वीवर उभा राहील. आणि ही माझी त्वचा छिन्नभिन्न होऊन नष्ट खाली, तरी मी देवाला देहासहित पाहीन, त्याला मी स्वतः पाहीन.” त्याच्या अंधकाराच्या समयात, तेव्हा येशू बरोबर आला. होय, महाशय.

103 मोशे, मोशेसाठी, ते अंधकाराचा समय इस्त्राएलात त्याच्यासाठी आला. तो बरोबर त्याच्या कर्तव्याच्या रेषेत होता; तेथे वर झुडूपात देवाला भेटला, आणि म्हणाला, “मी आहे तो आहे.” तो खाली गेला आणि तो सर्व प्रकारच्या यान्नेस आणि याब्रेसच्या जादूविरुध्द लढला, जे त्याच्या कार्याची नक्कल करण्याचा प्रयत्न करीत होते. ह्या सर्वसमयी, तो देवाशी खरेपणाने उभा राहीला. त्याने शेवटी इस्त्राएलास विश्वास करण्यास लावले. आणि येथे तो मिसाराबाहेर आला, वचनदत्त देशाकडे—कडे जात होता, जेथे देवाने म्हटले, “तू ह्या डोंगरावर माझी उपासना करशील.” तो देवाचा शब्द होता. मोशेला ठाऊक होते की त्याला त्या डोंगरावर जावे लागणार. आमेन. देव तसे बोलला! कोणताही फारो त्याला मारु शकत नव्हता. कोणताही सैतान त्याला मारु शकत नाही. कोणीही त्याला मारु शकत नाही. तो त्या डोंगरापाशी येत आहे. आमेन. हालेलुयाह! मला धार्मिक असल्यासारखे वाटते. तो त्या डोंगराकडे जात आहे.

104 तसेच आपणही आपल्या गौरवाच्या मार्गावर आहोत! आपल्याला काहीच थांबवू शकत नाही. नाही, महाशय. देव त्याचे वचन सिध्द करील. मी पर्वा करीत नाही की काय घडत आहे, तो ते कसेही करणार आहे. होय.

105 तो त्याच्या मार्गावर, बरोबर कर्तव्याच्या मार्गात. येथे त्याने, डोंगराच्यामध्ये संशय व्यक्त करणारे उद्गार काढले. त्याने त्याच्यामागे गोंगाट ऐकला. तो काय होता? फारोचे रथ, हजारो, सर्व घोडे, रथ, स्वार, ह्यासह सर्व सैन्याने पाठलाग केला, त्याच्या पाठीस लागले आणि त्यांना खाली पाडण्यास आले, तेथे तांबडा समुद्र आला, त्याला कापून टाकले असते. त्याने काय केले? तो व्याकुळतेत आला...तो दुःखी झाला. सर्व लोक ओरडू लागले, “आम्हाला आता येथे आणले ते कशासाठी. फारो आम्हाला मारेल, त्याची तरवार आमच्यामधून जाईल. आमची लेकरे ह्या रानात येथे मरतील.”

मोशेने धावा केला, “हे देवा!”

106 आणि तेव्हा येशू दृश्यात आला. तो अग्नीस्तंभव होता. ते बरोबर आहे. तो खाली आला आणि तो त्याच्या आणि संकटाच्यामध्ये वर होता. आमेन. तो आपल्यामध्ये चालणारा आहे. तो मध्ये उभे राहणारा आहे, आमेन. एक मध्यस्थ. तेथे तो उभा राहिला, तेथे उभा होता. मिसऱ्यासाठी अंधार, जे त्याविषयी काहीतरी प्रयत्न करण्यासाठी येत होते. तो त्यांच्यासाठी प्रकाश होता त्यांना चालविण्यासाठी. नंतर सकाळी जेव्हा वारा जोराने वाहू लागला, त्या रात्री, तेव्हा त्याने काय केले? तो अग्नीस्तंभाच्या रुपात तेथे आला.

107 लक्षात ठेवा, तो अजूनही तोच अग्नीस्तंभ आहे. होय, महाशय, जेव्हा तो पृथ्वीवर होता, त्याने म्हटले, “मी देवापासून आलो आहे, आणि मी देवाकडे जातो.”

108 आणि त्याचा मृत्यु गाडणे, पुनरुत्थान आणि स्वर्गारोहणानंतर, संत पौल त्याच्या दिमिष्काच्या रस्त्यावर असताना, तो अकस्मात त्या अग्नीस्तंभाद्वारे तेथे आदळला. आठवण ठेवा तो एक इब्री होता. त्याने हे म्हटले नसते...तो म्हणाला, “प्रभो, तू कोण आहेस?” मोठा एल–ओ–आर–ड, एलोहिम. “प्रभो तू कोण आहे ज्याचा मी छळ करतो?”

तो म्हणाला, “मी येशू आहे.”

109 आमेन! हालेलुयाह! तोच सुरुवात आणि शेवट आहे. तो आजही सारखाच आहे. “आणखी थोडा वेळ आणि जग मला आणखी पाहणार नाही, तरी तुम्ही मला पाहाल. मी तुम्हाबरोबर असेन, तुम्हामध्ये असेन.” तोच अग्नीस्तंभ, तो परमेश्वर त्याच गोष्टी करीत आहे. त्याच अभिवचनासह, आमेन, त्याचे वचन प्रकट करीत आहे. “मीच पुनरुत्थान आणि जीवन आहे. मी तोच जो आहे, जो होता, जो आहे, आणि जो येणार आहे.” होय, महाशय. होय.

“आपल्या पूर्वजांनी अरण्यात मान्ना खाल्ला.”

110 त्याने म्हटले, “ते प्रत्येक जण मेले. परंतु, मी आहे, तो आहे.” मोशे...त्या जळत्या झुडुपात, तो मी आहे, तो अजुनही तोच आहे, मी होतो नाही; मी आहे, सर्व समयी, वर्तमान काळ.

111 आपण येथे पाहतो की मोशेला ह्या कोपऱ्यात आधार मिळाला, आणि ख्रिस्त खाली आला होता. आता, आणि बायबल सांगते की, “मोशेने, ख्रिस्तप्रित्यर्थ विटंबना सोसणे ही मिसर देशांतील धनसंचयापेक्षा अधिक मोठी संपत्ती आहे असे गणिले.” ख्रिस्तप्रीत्यर्थ विटंबना! हा अभिषेक होता, लोगॉस जो देवातून निघाला होता. दूत, कोणीही बायबल वाचणारा जाणतो की तो दूत ख्रिस्त होता. आणि तेथे तो अरण्यात होता, आणि तो त्या रुपात प्रकट झाला ज्यात तो प्रकट होणार होता. देवाचा महिमा असो!

112 तो आजही त्या स्वरुपात येतो, तोच ख्रिस्त त्याला प्रकट करतो.

113 त्याने त्यांना म्हटले, तो त्यांना बाहेर काढील. तो ते करीत होता. तेथे तो वचनाच्या बाजूला उभे राहण्यासाठी, ते सिध्द करण्यासाठी आला. नंतर तो आल्यानंतर, जसे त्याने मार्थाबरोबर केले, नंतर त्याने बोलावले. त्याने म्हटले, “मोशे, तू माझा धावा करीत काय बसलास? ह्या लोकांना सांग की, पुढे चला.” त्या अंधकाराच्या समयात, तांबडा समुद्र उघडला आणि ते पलिकडे त्यांच्या मार्गावर देवाचे वचन पूर्ण करण्यासाठी गेले. हो, मोशेच्या अंधकाराच्या समयात, तेव्हा येशू बरोबर आला. आता आपल्याकडे समय आहे...आणि त्याने मोशेला बोलावले.

114 आम्ही तुमचे लक्ष अजून एका लहान मनुष्याकडे खेचू इच्छितो. त्याचे नाव याईर होते. तेथे त्यांच्यासारखे आज जगात पुष्कळ आहेत. तो एक गुप्त विश्वासी होता. त्याने येशूवर प्रेम केले. त्याने त्याच्याविषयी ऐकले होते. त्याने त्याच्यावर विश्वास ठेवला. परंतु तुम्हाला माहीत आहे, त्याने त्याला अगोदरच संघटनेशी जोडले होते. होय,...तो—तो—तो बाहेर येऊ शकला नाही आणि त्याची कबुली देऊ शकला नाही. त्याने त्यावर विश्वास ठेवला, परंतु तो त्याची कबुली देऊ शकला नाही, म्हणून तो अविश्वासणाऱ्यांबरोबर सामील झाला. परंतू त्याने खरोखरीच त्यावर विश्वास ठेवला.

115 तुम्हाला माहीत आहे जेव्हा एखादा मनुष्य त्या स्वरुपात येतो, कधीतरी देव त्याला कठीण संघर्षात आणतो. ते दुःख असते जेव्हा आपण वास्तवात आपले रंग दाखवतो, आपण खरोखरी कोण आहोत.

116 तर तेथे तो होता, तो अगोदरच अविश्वासणाऱ्यांना सामिल झाला होता, आणि तो त्यांच्यात गेला होता आणि त्याचे नाव पुस्तकात लिहीले होते, आणि तसेच काही. आणि तो एक याजक होता, आणि म्हणून तो—तो सहज कबुली देऊ शकत नव्हता, कारण ते त्याचे भोजनाचे तिकीट होते. तरी, परंतु तो अजूनही येशूवर विश्वास ठेवीत होता.

117 एके दिवशी, त्याची लहान मुलगी आजारी पडली. ओह, माझ्या देवा. त्याने, निःसंशय मनुष्याने जर...तो त्यासारखा असतो, डॉक्टरला बोलावले असते. वैद्य आला, मुलीला तपासले. तिचा ताप अधिकच वाढत गेला. काही वेळानंतर ती इतकी गरम झाली आणि सर्व गोष्टी, ती शेवटी मरणास टेकली. तो अतिशय दुःखात होता. त्याला काहीतरी करावे लागणार होते. त्याला, त्याला अगदी काय करावे सुचत नव्हते. आता त्याने विचार केला, "जर मी फक्त त्याला शोधू शकलो, जेथे तो आहे" आता तो कधीच रात्र होईपर्यंत थांबला नाही, जसे निकदेमाने, त्याची गुप्ततेत मुलाखत घेण्यासाठी केले. वेळ निर्णयाची होती, क्रिया करण्याची वेळ आली होती आणि तेव्हा त्याने क्रिया केली पाहीजे.

118 आणि मला वाटते, भावा, बहिणींनो तसेच आताही आहे. कृती करण्याची वेळ आली आहे. समय आला आहे की विश्वास करा किंवा विश्वास करु नका. ती वेगळे होण्याची रेषा प्रत्येक पुरुष आणि स्त्रीकडे येते. ती प्रत्येक मुलकडे येते. कधी–कधी जेव्हा तुम्ही ती रेषा ओलांडता, तेथे फक्त एक गोष्ट उरते, ती आहे न्याय, जेव्हा तुम्ही दया आणि न्याय ह्याच्यामधून जाता, तेव्हा तुम्ही ती रेषा ओलांडता.

119 लक्षात असू द्या, तो दुःखात होता. त्याला काय करावे हे माहीत नव्हते. तेथे त्याचे याजक, सर्व रब्बी त्याच्या सभोवती उभे होते. सहभागिता त्याच्याबरोबर होती, तेथे खाली सर्व, त्याची लहान मुलगी मरताना पहात होते. डॉक्टर बाहेरच्या बाजूला, त्याचे हात बांधून, त्याचे हात हालवीत उभा आहे, "मला जे माहीत होते, प्रत्येक औषध मी दिले आहे, आणि अजूनही..."

120 पाहीले, तेथे सर्व समयी येशू काम करीत होता. येशू हे एका उद्देशाने करीत होता, की त्या लहान व्यक्तींतून रंग बाहेर आणावे. काही वेळानंतर, मी त्याला त्याची लहान काळी टोपी जाऊन घेताना पाहीले आणि ती घेतली, त्याचा लहान याजकाचा कोट घातला.

"तू कोठे जात आहेस?"

121 "मी...मी ऐकले आहे तो खाली नदीकडे आहे. मी त्याच्यामागे जात आहे!" ओह, माझ्या देवा! तो निघून गेला!

122 त्या दुःखाच्या समयात, त्याला निर्णय घ्यावा लागला. त्याचे मूल मरु दे, किंवा त्याला कळू दे, ते वचनाचे प्रकटीकरण आहे. तो एक याजक होता, आणि त्याने वचन

वाचले होते, आणि त्याला माहीत होते की ते देवाचे प्रकटीकरण आहे. देव ख्रिस्तामध्ये जगाचा त्याच्याशी समेट करीत होता. त्याला ते माहीत होते, आणि ह्या विषयावर त्याच्यावर दबाव देण्यात आला. त्याला चूक करावी लागली होती, त्याचे मूल मरु द्यावे. किंवा त्याची कबुली द्यावी. जेव्हा तो त्या दुःखात होता, ती तीच वेळ होती की येशू तेथे आला. तो त्याला भेटण्यास गेला, तो म्हणाला, तो म्हणाला, “मी तु जे सांगशील, तसे तुझ्याबरोबर येईन.” आणि बाहेर मार्गावर येथे एक व्यक्ती धावत आला, तेथे एक वाईट बातमी घेऊन. त्याने कूबली दिली की तो त्याच्यावर विश्वास ठेवतो. त्याने त्याला स्वतःला तेव्हा सभाबहिष्कृत केले होते, आणि त्याला स्वतःला लोकांसमोर उघड ठेवले की तो येशूवर विश्वास ठेवणारा आहे.

123 आणि तेथे कोणी एक धावत आला, म्हणाला, “कोणाला श्रम देऊ नको, कारण तुझी मुलगी मरण पावली आहे. ती काल मरण पावली. तिचा मृत्यु झाला आहे. त्यासाठी अधिक प्रयत्न करु नको.”

124 आणि त्याच्या कोमल हृदयाला जणूकाही धक्का बसला. परंतु त्याने पाहिले आणि ते येशूचे डोळे पाहिले. म्हणाला, “मी तुला सांगितले ना का? भिऊ नको, जर तू देवाचे गौरव पाहू इच्छितो. तुला कसली भीती वाटते? मी तुला अगोदरच सांगितले आहे की मी जाईन.”

125 त्याने अगोदरच सांगितले होते तो येईल. त्याने अगोदरच सांगितले की तो हे करील आणि येथे तो ते करीत आहे. आमेन. त्याने म्हटले तो अंतिम दिवसात उभा राहील आणि ह्या गोष्टी करील, जसे त्याने केले, जसे आपण काल रात्री वाचले आणि त्याविषयी बोललो. येथे तो ते करीत आहे तू कशाला भीत आहेस?

126 लक्ष द्या, जेव्हा तो आला, आणि त्याने तिला मेलेल्यांतून बोलावले. तो तेथे आला आणि तिला मरणातून बोलावले.

वृध्द आंधळा बर्थलमय, एकदा, अंधकाराच्या समयाने त्याच्यावर प्रहार केला.

127 येशू तेथे खाली होता, तेथे यरीहोमध्ये मध्ये एका फूल गॉस्पल बिजनेस मेनसाठी न्याहरीची तयारी करीत होता, आणि तेथे त्याच्याकडे जक्कय होता. तो त्याला झाडाखाली, रस्त्यावर भेटला होता म्हणून जेव्हा तो होता...बरे, तो दुसरे काही आयोजीत करणार नाही, माझी खात्री आहे. समजले? म्हणून तेव्हा जेव्हा तो तेथे खाली आला, आणि तो त्याच्याकडे तो होता, जक्कय त्याच्याबरोबर गेला होता.

128 वृध्द आंधळा बर्थलमय हा लहानपणापासून आंधळा होता. म्हणून त्याला वाटले येशू कदाचित त्या फाटकापर्यंत येईल, आणि तो वाट पाहत होता. काही वेळानंतर त्याने मोठा आवाज ऐकला, आणि सर्वजण तेथून येत होते.

129 आणि त्याने याजकाला बोलताना ऐकले, “हे! हे! तू वर तेथे टेकडीवर जात आहे! केले—केले—केले...आम्ही ऐकले की तू मृताला उठवतोस आपल्या येथे मृतांनी पूर्ण भरलेली दफन भूमी आहे. जर तू मसीहा असशील; जर तू मसीहा असशील, तर येथे ये आणि ह्या मेलेल्यांना उठव.”

130 तुम्हाला ठाऊक आहे, तोच सैतान आजही जीवंत आहे, पहा, धर्माच्या रुपात, त्याच प्रकारे. समजले?

131 “जर तू मसीहा असशील, आपण...तू मेलेल्यांना उठव; आमच्याकडे दफन भूमी त्यांनी भरलेली आहे. ये.” आणि ओह, सर्वजण ओरडत होते. एक म्हणत होता. “संदेष्ट्याला होसान्ना!” दूसरा *हे*, *ते* किंवा *दूसरे* म्हणत होता. असा गोंधळ!

132 ह्या वृध्द आंधळ्या मनुष्याला वाटले, “ओह, मी त्याला चुकविले. तो तेथे खाली आला, आणि मला वाटले तो येथे आला. मला चूकीच्या जागी ठेवण्यात आले आहे.” आणि तो ओरडू लागला. त्याला वाटले, “जर तो वचन आहे, तो परमेश्वर आहे; तो येथे आला पाहीजे.” म्हणून “ओ येशू, दाविदाच्या पुत्रा, माझ्यावर दया करा!” त्या दुःखाच्या समयात, त्याने बोलावले.

133 आता येशू, जर तुम्ही येथे त्याचे अवलोकन केले, यरीहो येथे होता. जेथे ते म्हणाले. तो बसला होता, जेथे येशू होता तेथून तो दिडशे यार्ड लांब होता. हजारो लोक त्याच्या सभोवती धावत होते, तो त्या माणसाची आरोळी ऐकू शकत नव्हता. नाही. परंतु त्याला त्याचा अनुभव झाला. तो थांबला.

134 ह्या एका रात्री मला प्रचार करायचा आहे. “आणि मग येशू थांबला,” ओह! “आणि तेव्हा येशू थांबला.” ओह!

135 परंतु जेव्हा येशू थांबला, ते काय होते? त्याने त्याला बोलावले. “गुरुजी आला आहे. धीर सोडू नको.” शिष्यांनी सांगितले, “त्याने तुला बोलावले आहे. तो तुला बोलावित आहे.” त्या गर्दीतून त्याला बाहेर बोलावले.

त्याने आता तीच गोष्ट केली. तुम्ही ग्रहण करता काय? समजले?

136 “गुरुजी आले आहे आणि तुला बोलावीत आहे.” आणि तो बोलावीत आहे आंधळेपणातून—तून प्रकाशाकडे, अंधारातून प्रकाशाकडे. आणि त्याने त्याला बोलावले, मरणांतून जीवनात गेला. “गुरूजी आले आहे आणि त्याने तुला बोलावले आहे.” आणि जेव्हा त्याने त्याला बोलावले, त्याने त्याला त्याची दृष्टी परत दिली.

137 ती रक्तस्त्रावी स्त्री, एकदा, त्या टेकडीवर, तीचे सर्व पैसे वैद्यावर खर्च केले होते. तीने, नि:संशय, त्यांनी ती—ती बैलाची जोडी विकली होती. त्यांनी तिचे—तिचे शेत विकले होते, ते गहाण ठेवले होते. त्यांनी जवळ होते, नव्हते ते सर्व वैद्यांवर खर्च केले होते, तरी तिला काही गुण आला नव्हता. तिचा रोग अधिकच बळावला होता. रक्तस्त्राव थांबत नव्हता. सतत, ते जात होते, ती गंभीर आणि गंभीर झाली होती.

138 आणि एके दिवशी, जेव्हा तेथे वर त्या टेकडीवर जेथे ती रहात होती, विणत बसली होती, तीने खाली दरीमध्ये पाहीले, आणि तिने एक नाव आत येताना पाहिली. सर्वजण धावू लागले, “संदेष्ट्याला होसान्ना!”

139 तीने त्याच्याविषयी ऐकले होते. विश्वास ऐकण्याद्वारे येतो. आता ती म्हणाली, “मी खाली जाईन आणि त्याला पाहीन.”

140 आणि जेव्हा ती खाली तेथे गेली आणि तीची दृष्टी प्रथम देवाचे वचन जे देहात प्रकट झाले होते त्यावर गेली, तेथे काहीतरी त्याच्या बोलण्यात आणि त्याच्या दिसण्यात होते, की तिने ओळखले की तो तोच आहे, होय. महाशय. “ओह, जर कशाप्रकारे मी त्याचे लक्ष फक्त वेधून घेऊ शकेन, जर मी फक्त त्याला कसेही करुन स्पर्श करीन!” आणि ती गर्दीपासून सरकत गेली आणि ती त्याच्या कपड्याला शिवली.

141 आता लक्ष द्या, ते तिचे बोट नव्हते की त्याची त्याला जाणीव झाली. नाही, महाशय, कारण पलिष्टी वस्त्र सैल पायघोळ असत…

पेत्राने म्हटले, “सर्वजण तुला स्पर्श करीत आहे!”

142 त्याने म्हटले, “परंतु हा वेगळा स्पर्श आहे. मला समजते की मी अशक्त झालो आहे.”

143 येशू आला होता. तिचे पैसे संपले होते, सर्वकाही संपले होते. परंतु त्या अंधकाराच्या समयात जेव्हा तिचा रक्तस्त्राव थांबत नव्हता, आणि वैद्य तो थांबवू शकत नव्हते, येशू आला. आणि त्याने काय केले? त्याने तिला बोलावले. जिने हे केले होते तिला पाहावयास. त्याने सभोवार बघितले, आणि तो म्हणाला, "तुला रक्तस्त्राव होता, परंतु तो थांबला आहे."

144 "तो काल, आज आणि युगानुयुग सारखाच आहे." "गुरुजी आला आहे आणि तो तुला बोलावीत आहे. तो आला आहे आणि त्याने बोलावले." त्याने तिला बोलावले आरोग्य दिले.

145 ती विहरीजवळील स्त्री, ज्याविषयी मागील रात्री आपण बोललो, सर्व आशा संपल्या होत्या. कदाचित, तिच्या पाचव्या पतीने तिला सोडले होते आणि तिने त्या रात्री सहावा नवरा घेतला होता, आणि तिला—तिला त्याच्याविषयी जरा संशय होता. नैतिकदृष्ट्या, तीचे पतन झाले होते. तिला एक चांगली स्त्री व्हायचे होते; ती, निःसंशय, ती बायबल वाचत होती.

146 आणि ती तेथे बाजूने जात होती, सुमारे अकरा वाजता वर जात होती. ती सकाळी लवकर येऊ शकत नव्हती. जेव्हा नीतिमान स्त्रीया तेथे येत. ते त्यांच्या पाण्याची घागर डोक्यावर घेत, आणि घागरी, आणि परत खाली जात. आणि म्हणून ती येऊ शकत नव्हती, त्यांच्यात मिसळू शकत नव्हती. त्या दिवसात त्यांना दूर ठेवले जात होते. सत्य आणि असत्य एकत्र मिसळत नसते. अनीतीमान, त्यांच्या ठिकाणी रहात होते, म्हणून ती त्यांच्यातल्या इतरांसमवेत येऊ शकत नव्हती. ते तिला येऊ देत नसत. म्हणून सर्वांनी पाणी घेतल्यावर आणि गेल्यानंतर…ती जे उत्तम त्यासाठी आली.

147 आणि तेव्हा ती ही घागर तिच्या डोक्यावर घेऊन तेथे आली, ह्यात शंका नाही ती विचार करीत जात होती, "आता, ज्या मनुष्याशी मी लग्न केले आहे, किंवा मागील रात्री ज्याला मी धरले आहे, त्याच्यावर मी संशयित आहे. तो एक मनुष्य आहे, तो इतका चमत्कारिक वागत आहे. मला—मला त्याच्याविषयी काहीच माहीत नाही. मला काहीच संधी नाही. मला समाजातून काढून टाकले आहे. आणि मी त्या कलीसीयात जाऊ शकत नाही…जरा त्यांच्याकडे पहा! मला काय करावे हे कळत नाही. मी दुःखात आहे. आणि मी बायबल वाचत आहे; खात्रीने, एके दिवशी, मसीहा दृश्यावर देईल आता मला माहीत आहे की त्यांनी दावा केला आहे की तेथे अशी काही गोष्ट नाही, आणि, 'ती तशी कदाचित शेकडो वर्षांपूर्वी, आणि हजारो वर्षांपूर्वी होती. आम्ही हजारो वर्षांपासून त्याची वाट पाहत आहोत, आणि तसे अजूनही घडले नाही, म्हणून आता आम्ही त्याची वाट पाहत नाही.' सर्व गोष्ट अशी आहे, ओह, नाही, आपल्याकडे कलीसिया आणि गोष्टी आहेत. आम्हाला आता त्याच्यासारख्याची गरज नाही." म्हणून तेव्हा ती तेथे विचार करीत, जात होती.

148 तुम्हाला ठाऊक आहे, जेव्हा तुम्ही त्याच्याविषयी विचार करता, तेव्हाच तो तुम्हास प्रकट होतो. जसे आपण काल रात्री पाहीले, जेव्हा ते अमावसच्या रस्त्याने जात होते.

149 जेव्हा ती त्या गोष्टींवर विचार करीत होती. तीने एका मनुष्यास, बोलताना ऐकले, "मला प्यावयाला पाणी दे."

150 ते कशाविषयी आहे? तिच्या अंधाराच्या समयात, जेव्हा तीची नैतिकता नष्ट झाली होती. कदाचित ती सुंदर नाजुक युवती, रस्त्यावर तसे राहण्यास गेली असेल. कधीकधी तो लहान मुलींचा दोष नसतो, तिच्या पालकांचा दोष असतो, जे तिला तसे करण्याची परवानगी देतात. आणि तेथे ती होती, कदाचित तिचे कुरळे केस सर्व खाली लटकत

असतील; ती कमजोर झाली होती, जगत होती, कंटाळलेली, आणि कोणालाही तिच्याशी काही कर्तव्य नव्हते, एक मुलगी, आणि कदाचित त्यामागे एक मोठी कहाणी असेल.

151 कसेही असो, मला एक गोष्ट माहीत आहे, तिने बायबल वाचले होते, आणि ती बायबलवर विश्वास ठेवीत होती आणि तेथे तिच्या अंतःकरणात खोल लहानसे बीज पडलेले होते, म्हणते, "जर कधी तसे घडले, मला ते समजेल." तिची त्याकरिता पूर्वीच नेमणूक केली होती.

152 त्या वृध्द यहुदाकडे पाहा, जो तेथे उभा आहे आणि जणू काही अभिनय जे त्याने केले. त्याच्या खोल हृदयात काळोख होता. प्रकाश त्याच्या कार्यात येथे चकाकत होता, परंतु खोल त्याच्या अंतःकरणात त्याने त्यावर विश्वास केला नाही. आणि...येथे ती आहे... पाहा, प्रकाश खाली तीथपर्यंत जाऊ शकला नाही. परंतु येथे ती विश्वास ठेवीत होती, तीने त्यावर विश्वास ठेवला होता, परंतु तीचे जीवन अंधारमय झाले होते, जेव्हा प्रकाश पडला, त्याने अंधार बाहेर काढला. परंतु जेव्हा प्रकाश येथे पडतो, याने त्यास सर्वत्र अंधार केला. हाच त्यांतला फरक आहे.

153 पाहा, त्या उद्देशाकरिता तीचा जन्म झाला होता. ती म्हणाली, जेव्हा त्याने तीला सांगितले तीला किती नवरे होते,...काय घडले? ती एकदम जणूकाही जागृत झाली. ती दुःखात होती. ती म्हणाली, "महाराज, आपण सदेष्टे आहा हे आता मला समजले. मला ठाऊक आहे की जेव्हा मसीहा येईल, तो ह्या गोष्टी करील."

154 तेव्हा त्याने तीला बोलावले. तेव्हा त्याने तीला बोलावले, "जो तुझ्याबरोबर बोलत आहे. तो मी तोच आहे." तीने ते देवाच्या वचनाद्वारे ओळखले त्याने तीला तीच्या पापांतून जीवनाकडे बोलावले. आणि तीचे नाव बायबलमध्ये आहे, आणि तीच्याकडे आज अविनाशी जीवन आहे.

155 तो तुम्हाला त्याचप्रकारे बोलवू शकतो, कारण तो काल, आज, आणि युगानुयुग सारखा आहे. तो...

156 होय, तीची नैतिकता गेली होती, परंतु तीला ठाऊक होते की त्याच्याकडे ती पारख आहे. तीला ठाऊक होते की तोच मसीहा असला पाहीजे. तेव्हा जेव्हा येशू म्हणाला, "मी तोच आहे, मी तोच आहे." तिला ठाऊक आहे तो तोच आहे.

157 एकदा शिष्य मचव्यात बाहेर होते, सर्व आशा संपुष्टात आल्या होत्या. ते येशूविना गेले होते. वादळ, आणि ते वादळ तसेच होते जसे ते लाजराच्या घरावर आले होते. सर्व आशा संपल्या होत्या. त्या लहानशा जुन्या नावेवर लाटा आदळून ती पाण्याने भरली होती. आणि ते ओरडत आणि रडत होते, आणि कदाचित प्रार्थना करीत होते आणि जात होते, आणि वीज चमकत होती, आणि नाव पाण्याने भरली होती. मचव्याची डोलकाठी खाली पडली होती, वल्हे तुटले होते, आणि ते एकमेकांना पकडून, रडत होते.

158 आणि त्या खऱ्या अंधकाराच्या समयात, तेव्हा येशू चालत आला. परंतु तो त्यांना छायेसारखा दिसला. तो भीतीदायक आत्म्यासारखा दिसला, आणि ते घाबरुन ओरडू लागले.

159 आजही तशीच बाब आहे. येशू तुमच्या अंधकाराच्या समयात येतो, आणि तुम्ही त्याला घाबरता. तुम्हाला कळत नाही ते काय आहे.

160 त्यांना माहीत नव्हते की तो काय होता. ते म्हणाले, "ओह, ते भूत आहे!" ते ओरडत होते.

161 आणि तेव्हा त्याने त्यांना बोलावले, म्हणाला, “भिऊ नका, मी आहे.” त्या अंधकाराच्या समयात, येशू, त्यांच्या मदतीस आला. तसेच तो सदैव करतो, अंधकाराच्या समयात येतो. तेव्हा येशू आला आणि त्याने स्वतःला प्रकट केले, आणि त्याच्याकडे आला.

पेत्राने म्हटले, “आपण असाल, तर पाण्यावरुन आपणाकडे येण्यास मला सांगा.”

येशूने म्हटले, “ये”

162 मित्रांनो, तुम्हाला ठाऊक आहे काय? तो लवकरच त्यांच्यासाठी ह्या अंतिम दिवसात येणार आहे. आता हे विचित्र नाही की मंडळीत पुन्हा अंधाराचा समय आहे?

163 मी येथे काही गोष्ट सांगणार आहे. ही शिकवण नाही. मी फक्त भविष्यवाणी करतो. तुम्हाला माहीत आहे काय घडत आहे? हे लवकरच घडणार आहे, माझे शब्द चिन्हांकीत करुन ठेवा. सर्व संप्रदाय एक्युमिनीकल परिषदेला मिळणार आहेत. जर त्यांनी तसे केले नाही. तर त्यांना परिषदेचा आधार मिळणार नाही. त्या कारणामुळे, तेथे बहिष्कार टाकण्यात येईल, आणि कोणीही ह्या मंडळ्यांत जाऊ शकणार नाही, किंवा कुठल्याही मंडळीत जाऊ शकणार नाही; तुमच्याकडे तुमच्या स्वतःच्या मंडळीतून खूण असल्याखेरीज, तुम्ही विकत घेऊ शकत नाही किंवा विकू शकणार नाही. तुम्ही पाहता की जसे ते होते, तसेच ते पुन्हा होणार आहे, पशूची छाप आणि मंडळी, आत्मिक लोक ते समजतील.

164 आणि तुम्ही पेंटीकोस्टल लोक, कसेतरी, ते समजतील. तुम्ही ते अनुभवायला लागले आहात. जेव्हा तुमच्या मंडळ्या पेंटीकॉस्टलच्या कित्येक संघटना; आणि मला तुमची नावे घ्यायची नाही, परंतु तुम्हाला आता माहीत आहे, ते ह्यामध्ये येत आहेत. त्यांनी त्याची साक्ष दिली आहे की ते होते आणि जेव्हा तुम्ही ते करता, तुम्हाला काय केले पाहीजे? तुम्हाला पवित्र आत्म्याच्या बाप्तिस्म्याच्या सुवार्तेची शिकवण सोडावी लागेल. तुम्हाला तुमची बायबलची शिकवण सोडावी लागेल.

165 आणि सदस्य त्यासाठी उभे राहणार नाही. खरे नविन जन्म पावलेले ख्रिस्ती, प्रथम मरतील. त्यांना वचनाद्वारे इशारा देण्यात आला आहे. त्यांना ठाऊक आहे ही गोष्ट होणार आहे. होय, महाशय.

166 आणि हे विचित्र नाही का? आणि ठीक ह्या अंधकाराच्या समयात, तेव्हा येशू बरोबर येतो आणि त्यांना बोलावतो, म्हणतो, “भिऊ नका, तो मी आहे. मी अजुनही तुम्हा समवेत आहे. मी येथे माझे वचन प्रकट करण्यासाठी आहे.” जसा तो तेव्हा होता, तसेच तो आताही आहे. त्याने म्हटले आहे तो ते करील. ओह, माझ्या प्रभो! गुरुजी आला आहे आणि आपल्याला बोलावले आहे.

167 येथे पुष्कळ आजारी लोक, निःसंशय, जे येथे बसलेले आहेत, आणि डॉक्टरने तुम्हाला सांगितले आहे. तेथे तुमच्यासाठी आशा नाही—नाही. तुम्ही कदाचित तुमच्या सर्वात अंधकाराच्या समयात असाल, परंतु लक्षात ठेवा, गुरुजी आला आहे आणि तुम्हास बोलावले आहे.

168 आणि कधीतरी, कधीतरी, गुरुजी येणार आहे आणि प्रत्येकाचे नाव पुकारणार आहे जी कोकऱ्याच्या जीवनाच्या पुस्तकात लिहीली आहे. जर तुमची तेथे नसतील, आता ती घालून घ्या, कारण तो येणार आहे आणि बोलावणार आहे. अगदी ते ही जे कबरेत आहेत. त्याची वाणी ऐकतील आणि जीवनाकडे येतील. गुरुजी येईल आणि तुम्हाला बोलावील.

आणि जेव्हा तो आज बोलावीत आहे. उत्तर द्या आणि त्या दिवसासाठी तयारी करा, हा माझा तुम्हाला सल्ला आहे.

169 ह्या समयाचे अभिवचन, त्याने अभिवचन दिले आहे तो येथे असेल, ज्या गोष्टी त्याने केल्या, तो त्या पुन्हा करील, आणि आता पुन्हा गुरुजी आला आहे आणि तुम्हाला बोलावीत आहे.

170 आपण आपली मस्तके झुकवुया. माझ्याकडे येथे अंदाजे सहा पाने अजून आहेत. परंतु मी—मी आता त्याकडे जाऊ शकत नाही. आपण आपली मस्तके झुकवूया. मी तुम्हाला लवकर सोडण्याचे अभिवचन दिले होते, आणि अगोदरच सव्वाबारा झाले आहेत.

171 स्वर्गीय पित्या, ओ प्रभू, ते पुन्हा घडू दे. सर्व ह्या गोष्टी ज्या मी सांगितल्या आहेत, "येशू आला आहे आणि तुम्हास बोलावतो." जेव्हा तो येतो तो काय करितो? तो बोलावतो. आणि प्रभू ते पुन्हा, घडू दे. आज रात्री तुझा पवित्र आत्मा लोकांमध्ये येऊ दे, प्रभू येशू आत्म्याच्या रुपात. आज रात्री तो येऊ दे आणि त्याला स्वतःला उघड करु दे. ह्या लोकांसारखा, कशाप्रकारे त्यांनी विश्वास ठेवला, प्रभु, आम्ही पण, विश्वास ठेवू. ते कित्येक असतील, कदाचित, त्यांना ही संधी कधीच मिळाली नसेल. आम्ही प्रार्थना करतो की तू त्यांना ती संधी आज रात्री पुन्हा प्रदान करशील. कारण आम्ही हे देवाच्या गौरवांसाठी, येशूच्या नावाने मागतो. आमेन.

172 ते तसेच आहे, बहिणी, परंतु फक्त ते घेऊन पुढे चल. ते योग्य आहे. बरोबर पुढे जा. ओह, सर्वांनी खरे शांत व्हा.

173 तुम्ही विश्वास ठेवता तो आला आहे? तो आहे. जेव्हा तो येतो अजुनही तो बोलावतो का? आता जर तुम्ही फक्त विश्वास कराल. जर तुम्ही फक्त देवाच्या वचनावर विश्वास कराल, देव ते प्रदान करील.

174 आता पाहा, माझ्याकडे प्रार्थना रांग वर बोलावण्यासाठी येथे वेळ नाही. मी त्यांना आज रात्री बाहेर बोलावणार आहे, जर प्रभूची इच्छा असे. गुरुजी आला आहे. तो ह्या अंतिम दिवसात त्याचे वचन पूर्ण करण्यासाठी आला आहे. आणि तेव्हा जो तो होता, तो आज आहे. जे त्याचे प्रकटीकरण किंवा स्वभाववैशिष्ट तेव्हा होते, ते आज आहे, कारण तो अजूनही देवाचे वचन आहे. तुम्ही त्यावर विश्वास करता काय? [मंडळी म्हणते, "आमेन"—संपा.] आणि देवाचे वचन मनातील विचार व हेतू ह्यांचे परिक्षक आहे. आणि त्या पध्दतीने त्याने तेव्हा केले, त्याने नेहमी तशा पध्दतीनेच केले आहे. तो अजूनही सारखाच आहे. जर तो ते आताही करील, तुम्ही त्याच्यावर विश्वास कराल काय? ते तुम्हाला त्याच्यावर विश्वास करण्यास लावील का?

175 तुम्ही जे लोक आता बाहेर आहात, मला प्रथम पाहू द्या आणि कळू दे जर तेथे कोणी आहे, ज्यांना मी ओळखतो, येथे कुठेही बसलेले आहे, ज्यांना मी ओळखतो.

176 जे सर्व सभोवती, वर *येथे* आहेत, जे मला ओळखत नाही, तुमचे हात वर करा, तुम्हाला माहीत आहे की मी तुमच्याविषयी काही जाणत नाही, आणि तुम्ही आजारी आहात, तुमचे हात वर करा. मला वाटते, सर्वजण. ठीक आहे, आता, तुम्ही विश्वास करता. तुम्ही तुमच्या संपूर्ण हृदयाने विश्वास करा. संशय करु नका. विश्वास ठेवा. देवावर विश्वास ठेवा.

177 मी तुम्हाला खऱ्यारितीने शांत राहण्यास सांगणार आहे, तुम्ही बसू शकता. सभोवती फिरु नका. कृपया फिरु नका. समजले? समजले? तुम्ही एक—एक प्राण, शरीर आणि आत्मा आहात आणि...आणि पवित्र आत्मा हा खरा भयपूर्ण आहे.

178 किती जणांना लक्षात आहे, पुष्कळ वर्षांअगोदर, जेव्हा मी येथे आलो आणि तुम्हाला म्हणालो, की पवित्र आत्मा? जेव्हा मी लोकांचा हात घेईन, त्याने मला सांगितले ही पारख येईल, आणि मग पुढे जा? तुमच्या लक्षात आहे का, ते लक्षात आहे का? परंतु त्याने म्हटले, "जर तू लोकांना तुझ्या विश्वासात घेऊ शकशील." खूप वर्षांअगोदर, ते दिवस लक्षात आहेत का? [मंडळी म्हणते, "आमेन"—संपा.] तुम्हाला विश्वास करावा लागेल.

179 मी एका मनुष्याला पाहिले, मला वाटते, तो येथे त्या दुसऱ्या सभेत तेथे बसला होता. आणि पवित्र आत्मा......मी जेव्हा प्रचार करीत होतो, त्याचे निरीक्षण करीत होतो. तो एक पांगळा मनुष्य होता. त्याच्या हाताखाली कुबड्या होत्या. आणि जेव्हा मी बोलण्यास सुरुवात केली, सैतान त्या मनुष्याकडे आला, एक काळी छाया. आणि मी ती माझ्या स्वतःच्या डोळ्याने पाहिली. तो उठला आणि बाहेर निघून गेला. तो सदैव पांगळाच राहील, समजले म्हणून तो, तो, जोथो होता तेथेच बरा झाला असता जर त्याने फक्त—फक्त...समजले? परंतु, मला ठाऊक नाही का. मला वाटते त्याने नेमके त्या शत्रूचे ऐकले. परंतु जर तुम्ही उभे राहाल आणि त्या छाया पाहाल, त्या गोष्टी त्या स्वरुपात पाहाल, जशा त्या आहेत, आणि त्यांना पाहा ते कसे करतात. पाहा, ते होईल.

180 आता, मी बरे करु शकत नाही. जो मनुष्य तुम्हास सांगतो की तो तुम्हाला बरे करु शकतो, तो खोटा आहे. तुम्हाला अगोदरच आरोग्य मिळालेले आहे. परंतु, ते येशू ख्रिस्ताची उपस्थिती ओळखणे आहे. आता, जर मार्थेला माहीत असते जर ती त्याला पुन्हा भेटू शकली, तर तिची मागणी मिळेल, कारण तो प्रकट झालेले वचन होता, आपण ह्या रात्री एवढा विश्वास ठेवू शकत नाही काय, त्यावर विश्वास ठेवण्यासाठी? निश्चितच, आपण ठेवायला पाहीजे. तो आला आहे, तो आला आहे. तो पवित्र आत्म्याच्या रुपात आला आहे. तोच तो आहे. आता तुम्ही फक्त प्रार्थना करा.

181 पाहा, वर येथे, जर माझ्याकडे कोणीतरी येथे उभे होते, अगदी माझ्या बाजूला येथे, फक्त—फक्त प्रार्थना करीत आहेत; इतके लोक प्रार्थना करताना पाहीले, ते संपूर्ण इमारतीत आहेत. तुम्हाला फक्त त्यांना पाहायचे आहे. तुम्ही म्हणू शकत नाही. "भाऊ ब्रॅन्हम बोला,..." नाही महाशय. मी—मी ते करु शकत नाही, तुम्ही मला एखादे स्वप्न देऊ शकत नाही. समजले? तुम्हाला स्वप्न पडू शकते. तुम्हाला, देव माझे स्वप्न तुम्हाला स्वप्नात देऊ शकतो, तुम्ही त्यावर विश्वास ठेवता, परंतु तुम्ही ते स्वतःहून करु शकत नाही, तुम्ही असे म्हणू शकत नाही की "भाऊ ब्रॅन्हम, मी आता तुमचे स्वप्न, स्वप्नात पाहणार आहे." नाही, तुम्ही ते करु शकत नाही. मी ही दृष्टांत पाहू शकत नाही. नेहमी तुम्हाला जो स्वप्न देतो, त्यालाच एकट्याला ते करणे आहे. तशाच प्रकारे ते दृष्टांताद्वारे आहे.

182 मी ह्या रांगेच्या शेवटी एका मनुष्याला संधीवाताने, पीडीत बसलेला पाहात आहे. जर तो त्याच्या संपूर्ण हृदयाने विश्वास करील, देव त्याला संधीवातापासून बरे करील. महाशय, तू विश्वास करतोस की तो ते करील? तेथे बसलेला, मेक्सीकन मनुष्य, शेवटच्या रांगेत बसलेला, तू ते विश्वास करशील का? ठीक आहे, सर.

183 एक युवती जी तुझ्या बाजूला बसलेली आहे, तिलाही, संधीवात झाला आहे, बाई, तू विश्वास करतेस देव तुला बरे करील? (काय *हा* ध्वनी पुन्हा धुमधुमत आहे काय? मला अडचण वाटते लोकांना ते ऐकू येत नाही) तू करशील? ठीक आहे.

184 दुसरी मेक्सीकन युवती जी तिच्या बाजूला बसलेली आहे, तिच्याविषयी काय? ती पोटाच्या त्रासामधून जात आहे. बाई, तू विश्वास करतेस की देव तुझे पोट बरे करील?

185 तीला ते मिळाले आहे. जेव्हा मी पाहतो तो प्रकाश खाली जातो, म्हणजे तसे घडले आहे. होय ते घडले आहे. तो तिच्यावर पडला. तेथे तो होता, तिच्याभोवती फिरत आहे…[टेपवर रिकामी जागा—संपा.]…ते केले आहे. पहा? जेव्हा त्याला विश्वास सापडू शकतो! पहा “पुष्कळ गोष्टी त्याला त्यांच्या अविश्वासामुळे करता आल्या नाही.”

186 येथे एक बाई प्रार्थना करीत बसलेली आहे, अगदी येथेच. ती भयभीत आहे. तीला भयभीत झाले पाहीजे. ती कर्करोगाच्या स्थितीत आहे, अतिशय वाईट. मी तुला ओळखत नाही, परंतु देव तुला ओळखतो. तू विश्वास करतेस की देव मला ह्या कर्करोगाविषयी किंवा दुसऱ्या कशाविषयी सांगु शकतो? माझ्याकडे बघ. तेथे खूपजण प्रार्थना करीत आहे, तुला समजले, मी त्यासाठीच ते सांगत आहे. आमच्याकडे पाहा. आता, होय, तू येथली नाहीस, हे तुझे घर नाही. तू पोर्टरवीले, कॅलिफोर्निया नामक ठिकाणाहून आली आहेस. ते बरोबर आहे. तू विश्वास करतेस की तू कोण आहेस हे देव मला सांगू शकतो? तो जाणतो. तुझे नाव श्रीमती विन्थम आहे. ते बरोबर आहे. आता विश्वास ठेव, आणि कर्करोग तुला सोडून जाईल. जर तू विश्वास ठेवशील! तेच सर्व देव तुला करण्यास सांगत आहे. जर तू विश्वास करशील!

187 तू त्यावर तुझ्या संपूर्ण हृदयाने विश्वास ठेवत नाहीस काय? कोणीतरी ह्या विभागात *येथे* आहे, तू विश्वास ठेवू शकत नाहीस काय? गुरुजी आला आहे आणि तुला बोलावले आहे. तो तुला मरणांतून जीवनाकडे बोलावीत आहे, आजारांतून आरोग्याकडे.

188 येथे पाठीमागे एक मनुष्य, डोके खाली करुन, प्रार्थना करील बसलेला आहे. तो खरोखरी त्याच्यासाठी प्रार्थना करीत नाही, तो इतर कोणासाठी प्रार्थना करीत आहे. ती एक—एक मुलगी आहे. ती त्याची मुलगी आहे. श्रीमान, तू विश्वास करतोस का? तुझ्या पायांना त्रास आहे. तुझ्या गुडघ्यांना त्रास आहे. ते बरोबर आहे. रडण्याची गरज नाही, तो तेथे तुझ्या बाजूला आहे. तुझी मुलगी हॉस्पीटलमध्ये आहे, ती आहे की नाही? क्षयरोगाची रुग्ण तू विश्वास करतोस. तू विश्वास करतोस काय? गुरुजी आला आहे आणि तिला बोलावले आहे. तू तिचा पिता म्हणून विश्वास करशील का? तू करशील का? तो कदाचित तिला आज रात्री भेट देईल, आणि तुला मग ते समाप्त होईल.

189 येथे एक लहान मुलगा आहे, लहान तपकीरी चेहऱ्याचा. तो त्वचेच्या आजाराने पीडीत आहे, आणि दमा, एक लहान मेक्सीकन मुलगा, मेक्सीकन मुलगा तेथे बसला आहे. तो येथला नाही. तो सॅन जोम येथील आहे. मुला, तू विश्वास करतोस काय? दुसरी गोष्ट, तुझा पिता तुझ्याबरोबर आहे. तो एक सेवक आहे. ते बरोबर आहे. तू विश्वास ठेवतोस की देव मला तुझे नाव काय आहे ते सांगू शकतो? ते तुझा खरा विश्वास मजबूत करील काय? तुझे नाव रुबेन आहे. आता विश्वास करतोस. होय. देव तुला पूर्ण करील.

190 गुरुजी आला आहे आणि तो तुला बोलावित आहे. ओह, पापी, ओह, आजारी व्यक्ती, तू पहात नाहीस का गुरुजी मनुष्यांमध्ये, विश्वासणाऱ्यांमध्ये प्रकट झाला आहे? तो त्याच्या विश्वास ठेवणाऱ्या लेकरांना आरोग्यासाठी बोलाविण्यास आला आहे. तो पाप्यांना पश्चातापासाठी बोलाविण्यास आला आहे. मंडळीचे, पतित सदस्य, गुरुजी आला आहे आणि तुम्हाला बोलावीत आहे.

191 तू ते विश्वास करतोस का? तू विश्वास करतोस की ते आता तुझ्या गरजेसाठी आहे? जर तू करतोस, तुझा हात वर कर, म्हण, “मी माझ्या गरजेसाठी विश्वास करितो.” मग तुझ्या पायांवर आता उभा राहा, आणि ते स्विकार कर. गुरुजी आला आहे. आणि तुला

बोलावतो. आणि कोणीही असो, तुझी गरज काहीही असो, गुरुजी आला आहे आणि तो तुला बोलावतो. तो काल, आज आणि युगानुयुग सारखा आहे.

192 ती कनिष्ठ स्त्री नगरात गेली, आणि म्हणाली, “या, त्या मनुष्याला पाहा ज्याने मी केलेले चुकीचे ते सांगितले.” तू नगरात गेला नाही. तू आला आणि ते स्वतः पाहिलेस, म्हणून गुरुजी आला आहे आणि तुला बोलावत आहे.

193 तुझे हात वर कर आणि त्याची स्तुती कर, आणि म्हण, “प्रभू येशू, मी एक पापी हे, मला क्षमा कर. मी पतित झालो आहे, मला पुन्हा घे, प्रभू मला पवित्र आत्मा पाहीजे; मला भर. मी आजारी आहे, मला बरे कर. मी पांगळा आहे. मला बरे कर.” गुरुजी आला आहे आणि तुला बोलावत आहे. आता तुझे हात वर कर आणि त्याची स्तुती कर. आमेन.

194 (आम्हाला येथे एक लहान कॉर्ड दे, “मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन.” तुम्हाला माहीत आहे? *मी त्याची स्तुती करीन*. तुम्हाला ते माहीत आहे, नाही का?)

तुम्ही विश्वास करता?

मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन,
ओह, पाप्यांसाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा;
तुम्ही सर्व लोकहो, त्याला गौरव द्या;
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येक डाग धुतला गेला आहे.

195 तुम्ही त्याच्यावर प्रेम करता? आता तो येथे असता तुम्हाला त्याला गाणे गाण्यास आवडणार नाही का? तो एक आत्मा आहे जो ह्या इमारतीतून फिरत आहे. त्याला तुमची अंतकरणे तुमच्याविषयी सर्व माहीत आहे. आपल्या पूर्ण हृदयाने त्याला गाणे गाऊया.

मी त्याची स्तुती करीन, (जेव्हा तुम्ही हे करता, तुमचे हात वर
करा), मी...(आता फक्त त्याची स्तुती करा)...स्तुती करा,
ओह, पाप्यांसाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा,
ओह, तुम्ही सर्व लोकहो, त्याला गौरव द्या,
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येक डाग धुतला आहे.

196 ओह, बाई, तू जी व्हीलचेअरमध्ये आहे, जर तू फक्त थोडा अधिक विश्वास करशील. “मी...” आपण पुन्हा एकवार तो प्रयत्न करुया. मी कशाची तरी वाट पाहत आहे.

मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन,
ओह, पाप्यासाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा;
अहो, तुम्ही सर्व लोकहो, त्याला गौरव द्या,
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येक डाग धुतला आहे.

197 आता आपण पुन्हा गात असता, मागे फिरा, कोणाचातरी हात पकडा, आपण ते गात असता, म्हणा, “मी त्याची स्तुती करीन” या आता सर्व एकत्र मिळून.

मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन.
पाप्यासाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा,
अहो, सर्व लोकहो त्याला गौरव द्या,
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येक डाग धूतला आहे.

198 अहो, पापी मित्रा, आता तू येथे येणार नाहीस का? वर या आणि त्याला स्तुती द्या, अहो सर्व लोकहो, तुम्ही सर्व लोक जे त्याला तारणारा म्हणून स्विकारु इच्छितात. त्याच्या उपस्थितीत, जेव्हा संत आत्म्यामध्ये त्याची उपासना करीत आहेत, तू येथे येणार

आणि उभे राहणार नाहीस का? म्हणा, “आज रात्री मी साक्ष देऊ इच्छीतो. मी त्याला स्तुती देऊ इच्छितो. मी येऊ इच्छितो. मला त्याची लाज वाटत नाही. माझी इच्छा आहे की जगाला समजावे की मी त्याला माझा तारणारा म्हणून स्विकारले आहे, येथेच जेव्हा तो येथे उपस्थित आहे.” आम्ही ते गात असता या.

मी त्याची स्तुती करीन, (तुम्ही येणार नाही का?) मी त्याची
 स्तुती करीन,
ओह, पाप्यासाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा;
अहो, तुम्ही सर्व लोकहो, त्याला गौरव द्या.
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येकाचे डाग धुतले आहेत.

199 ओह, ते योग्य आहे, बाई येथे ये. दुसरे कोण येईल, ख्रिस्ताच्या उपस्थितीत? बहिणी येथे ये, येथे उभी राहा.

200 काही इतर व्यक्ती जे आताच त्याला तुमचा तारणारा करु इच्छितात, ते लाज धरीत नाही. त्याने म्हटले, “जर तुम्ही माणसांपुढे माझी लाज धराल, मी माझ्या पित्यासमोर आणि पवित्र देवदूतांसमोर तुमची लाज धरीन.” जर तुम्ही आता त्याची लाज धरली नाही, आणि तुम्ही त्याला तुमचा तारणारा करु इच्छिता, जेव्हा तो येथे आहे! तुम्ही त्याला पाहीले आहे. तो इतका परिपूर्ण आहे, वचन स्वतः ते प्रकट करते. संत आता उपासना करीत असता वर या. तुम्ही वर येणार नाही का?

201 महाशय, परमेश्वर तुम्हाला आशीर्वादीत करो. येथे एक वृध्द स्त्री आली आहे, जी योग्य वयात आली आहे. आता तुम्ही येणार नाही का?

मी त्याची...(आता ते गा)...मी त्याची स्तुती...

202 ते बरोबर आहे, तरुण जनांनो, येथे जवळ या, फक्त स्तुती करा. बाई, परमेश्वर तुला आशीर्वादीत करो, ते करण्याचा हाच मार्ग आहे. तरुणांनो, परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो.

...पाप्यांसाठी वधलेल्या;
तुम्ही सर्व लोकहो, त्याला गौरव द्या,
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येकाचे डाग धुतले आहेत.

203 जेव्हा सेवक ह्या लोकांकडे जात आहेत, आता कोणी इतर येणार नाही का? मार्ग बहकलेल्यांनो, तुम्ही याल का? म्हणा, “मला माझ्या जीवनाची लाज वाटते?” येथे तो आहे. तुम्ही मी परमेश्वराचा सेवक म्हणून विश्वास करता? तुमचे हात वर करा. का, येशू ख्रिस्त आमच्यामध्ये आहे. तुम्ही येणार नाहीत का?

त्याला गौरव द्या...(तुम्ही येणार नाही का, त्याला गौरव द्या?)...
 लोकहो,
कारण त्याच्या रक्ताने धुतले आहे...

204 मार्था, तू येतेस का, किंवा तू मरीयेबरोबर घरात बसणार आहे? तू पुन्हा काही संघटनेमध्ये राहणार आहेस, आणि म्हणणार आहेस, “ओह, माझी मंडळी अशाप्रकारे विश्वास करीत नाही.” जेव्हा ख्रिस्त केला गेला? तुम्ही मागे बसणार आणि ते म्हणणार आहात का, किंवा तुम्ही बाहेर येणार आहात? “मी तुम्हाला सांगेन, जेव्हा मी...” नाही. आज, हा समय आहे. मृत्यु याईरच्या कन्येसारखा तुमच्या सभोवती लोंबकळत आहे.

205 आता या! मागे बहकलेल्यांनो, आता या. पाप्यांनो, आता या. हीच वेळ आहे. गुरुजी आला आहे आणि तो तुम्हाला बोलावीत आहे. तो तुम्हाला बोलावीत आहे. तुम्ही म्हणाल, “मला कसे ठाऊक?” तो माझा आवाज तुमचे वापरत आहे. जर तो माझा आवाज आजार,

पीडा आणि गोष्टी सांगण्यात वापरीत आहे. तुम्हाला माहीत नाही की तो पापासाठी बोलवत आहे? बाहेर या! आता या, ही तुम्हाला आजपर्यंत मिळालेली शेवटची संधी असू शकेल.

206 पुन्हा एकदा, तेथे आणखी अधिक आले पाहीजे, मित्रांनो, मी तुम्हाला अशाप्रकारे बोलवून गोंधळात टाकू इच्छित नाही. ते बरोबर नाही. तुम्ही कधी...त्या परुश्यांसारखा विचार कराल की त्यांचे तारण झाले आहे, परंतु ते वाचले नव्हते. तुम्हीही तसाच विचार करीत आहात. आता या.

207 खात्री करा! अर्धवट संधी घेऊ नका. जर तुमच्या मनात लहानसा संशय असेल, तर संधी घेऊ नका. आता या. ही वेळ आहे, आता जेव्हा झरा वाहत आहे, जेव्हा पवित्र आत्मा येथे आहे. गुरुजी आला आहे. तो लहानसा संशय म्हणजे, तो तुम्हाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे, "तुम्ही संशय करीत आहात" तो सोडून द्या. आता, या, गुरुजी आला आहे आणि तुम्हाला बोलावतो. ते बरोबर आहे, फक्त येत राहा, येत राहा.

मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन, (तुम्ही त्याला
  गौरव देण्यास येणार नाही का?)
पाप्यांसाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा.
सर्व तुम्ही लोकहो, त्याला गौरव द्या;
कारण त्याच्या रक्ताने प्रत्येकाचे डाग धुतले आहेत.

208 आता पापी त्याचा दावा करीत येत असता, लोक त्याला स्तुती देवो, जसे आता आपण ते गात आहोत. तुमचे हात वर करुन त्याला स्तुती देण्यासाठी गा, आता, सर्व एकत्र मिळून.

मी त्याची स्तुती करीन, मी त्याची स्तुती करीन
पाप्यांसाठी वधलेल्या कोकऱ्याची स्तुती करा!

209 फक्त त्याला स्तुती द्या! येथे भोवती असणारे तुम्ही लोकहो, प्रार्थना करा, तुम्हास क्षमा करण्यासाठी त्याच्याकडे मागा. तेच तो करील. गुरुजी आला आहे आणि तुम्हास बोलावत आहे. परमेश्वर तुम्हास आशीर्वाद देवो.

***मग येशू आला आणि बोलावले*** MAR64-0213

(Then Jesus Came And Called)

हा संदेश, भाऊ विल्यम मिरीयन ब्रॅन्हम ह्यांच्या द्वारे, मूळ स्वरूपात इंग्रजीमध्ये, गुरुवारी संध्याकाळी, 13 फेब्रुवारी, 1964 साली, एलिअट ऑडीटोरीअम, टूलेर, कॅलिफोर्निया, संयुक्त राज्य, अमेरिकेत प्रचार केला गेला, जो चुंबकीय टेप रेकोर्डिंग मधून घेतला गेला आहे आणि इंग्रजीमध्ये विस्तृत स्वरुपात छापला गेला आहे. हे मराठी भाषांतर, व्हॉइस ऑफ गॉड रेकॉर्डिंग्स ह्यांनी छापले आहे आणि त्याचा वाटप करण्यात आला आहे.

MARATHI

©2018 VGR, ALL RIGHTS RESERVED

VOICE OF GOD RECORDINGS, INDIA OFFICE
19 (NEW NO: 28) SHENOY ROAD, NUNGAMBAKKAM
CHENNAI 600 034, INDIA
044 28274560 • 044 28251791
india@vgroffice.org

VOICE OF GOD RECORDINGS
P.O. BOX 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A.
www.branham.org

**छपाईच्या हक्काची सूचना**

संपूर्ण हक्क राखीव आहेत हे पुस्तक घरातील प्रिंन्टरवर स्वतःच्या उपयोगा करिता, किंवा दूस-यांना मोफत देण्या करिता, येशू ख्रिस्ताची सुवार्ता प्रसार करण्या करिता एक साधन म्हणून छापू शकता येईल. हे पुस्तक विकू शकता येणार नाही. किंवा फार मोठया प्रमाणावर प्रती काढण्यास मनाई आहे. किंवा वेबसाईडवर प्रसार करण्यास मनाई आहे. कोणत्याही प्रकारच्या पुर्नःप्राप्ति प्रणाली मधून नक्कल करण्यास मनाई आहे. दूस-या भाषेत भाषांतर करण्यास किंवा रक्कम गोळा करण्यास मनाई आहे. या सर्व गोष्टीं करण्याकरिता Voice of God Recodings यांची लिखित परवानगी घेणे आवश्यक आहे.

अधिक माहिती करिता किंवा इतर उपलब्ध गोष्टीं करिता कृपया संपर्क साधा.

VOICE OF GOD RECODINGS

P.O. Box 950, JEFFERSONVILLE, INDIANA 47131 U.S.A

www.branham.org.